पुणे, किशोर–वर्ष ५५, अंक १ ला, जानेवारी २०२६ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.55, Issue 1, January, 2026 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

जानेवारी २०२६



# हीरकमहोत्सवी बालभारती

# भारतीय संविधानामृत

मिलिंद जाधव




भारतीय संविधानाचे हे
अमृत महोत्सवी वर्ष
नमन आमचे त्रिवार त्यास
दिले न्याय, हक्क नि हर्ष

इतिहास संविधानाचा थोडा
कवनांमधूनी मी गातो,
काळ थोडा मागे जाऊन
स्वातंत्र्याआधी जातो.

१९३५ चा कायदा जो
ब्रिटिशांच्या हातचा दोर,
स्वतंत्र भारतासाठी होता हवा
हितकर कायदा थोर.

फैजपूर अधिवेशनात केला
सर्वांनी असा निर्धार,
भारतीय संविधान ठरेल
आपला भक्कम आधार

समाजवादी लोकशाही
मागणी होती सर्वांची
१९४६ साली झाली मग
स्थापना संविधानसभेची

प्रसाद–नेहरू, आंबेडकर–पटेल,
विजयालक्ष्मी, सरोजिनी–कौर,
वकील, विद्वान, व्यापारी, कुलगुरू,
महिला, संस्था व प्रांत प्रतिनिधी थोर

सच्चिदानंद सिन्हा अध्यक्ष हंगामी,
तर राजेंद्र प्रसाद स्थायी,
लोकशाहीचा पाया घडविण्या
बाबासाहेबांनी झिजविली शाई

२९ ऑगस्ट १९४७ ला झाली
मसुदा समितीची निर्मिती
अध्यक्ष त्याचे बाबासाहेब
कायदेपंडित शोभती

दोन वर्षे, अकरा महिने
अठरा दिवस अखंड,
१७५ बैठकींमधूनी निर्मिले
संविधान असे हे प्रचंड

ब्रिटन, अमेरिका, आयर्लंडचा
घेतला आवश्यक गाभा
सर्वात मोठ्या लिखित घटनेत
भारतीय मूल्यांचाच धागा

न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता
प्रास्ताविकातून संदेश,
कोट्यवधींच्या उत्थानातून
ठरेल उज्ज्वल भारत देश.

जपू संविधान मूल्ये सदा
हित असे सर्वांचे ज्यात
इमान राखू तत्त्व हे पाळू,
जोवर राहील जीव हयात.

संपर्क : ९४२३९०२४५४

जानेवारी २०२६, वर्ष ५५ वे, अंक १ ला,
पौष-माघ, शके १९४७


# किशोर

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| भारतीय संविधानामृत | मिलिंद जाधव | २ |
| हीरकमहोत्सवी बालभारती | किरण केंद्रे | ६ |
| नावामागची गोष्ट | दासू वैद्य | १२ |
| क्रांतीज्योती | उत्तमराव अरखराव | १७ |
| श्यामली | डॉ. नंदू मुलमुले | १८ |
| आज काय झालं? | कार्टुनिस्ट इरा | २१ |
| मराठीची थोरवी | डॉ. संगीता बर्वे | २२ |
| चला चित्र रंगवूया | रेश्मा बर्वे | २५ |

**अभिजात मराठी विभाग**

| | | |
|---|---|---|
| जादूचा खजिना, आनंदाचे पंख देणारा! | प्रवीण दवणे | २६ |
| टिंबाची भाषा | डॉ. निलिमा गुंडी | २८ |
| गंमत शब्दांची | प्रा.विश्वास वसेकर | ३० |
| प्रश्नमंजूषा | प्रा.सुधीर कदम | ३१ |
| कापसाची लेक | डॉ. कैलास दौंड | ३२ |
| दे आम्हांला नववर्षा | विलास मोरे | ३५ |
| कुडकुड थंडी भरली रे | आशिष वरघणे | ३७ |

**बालविभाग**

| | | |
|---|---|---|
| कुतूहल | योगेश दराडे | ३८ |
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा | घनश्याम देशमुख | ४४ |
| बारा महिन्यांचे गाणे | सतीश खरात | ४६ |

**ENGLISH SECTION**

| | | |
|---|---|---|
| Dear Students, You are | Anand Deshmukh | ४७ |
| The Heron's Feather | Dr. Rasika Thosar | ४८ |
| Funny Puzzle | Ghanashyam Deshmukh | ५० |



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

- **संपादक :**
अनुराधा ओक, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
- **प्रकाशक :**
हेमंत बाबर
प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई
- **कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे
- **निर्मिती अधिकारी :**
मनिष निघोट
- **वितरण व्यवस्थापक :**
जी. आर. पानसरे
- **मुखपृष्ठ :**
गणेश कळसकर ※ संपर्क : ७७७५९४५५५२
- **चित्रांकन :**
गिरीश सहस्रबुद्धे, घनश्याम देशमुख,
रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते,
लोकेश कुलकर्णी, राहुल पोतदार,
कार्टुनिस्ट इरा, माईंडईट संवाद
- **अक्षरजुळणी :** किशोर विभाग

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

- **ऑनलाईन वर्गणीकरिता :**
www.kishor.ebalbharati.in



**पत्रव्यवहाराचा पत्ता:**
**कार्यकारी संपादक, किशोर,**
**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती**
**व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४
संपादकीय : ०२०- २५७१६१०७
वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# प्रिय किशोर

आपणास कळवण्यास आम्हांला अतिशय आनंद होत आहे की, रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, स्टेशन ठाकूरवाडी येथे आमच्या शाळेचे श्री. ज्ञानेश्वर बसवेश्वर येळदरे, उपशिक्षक, संजय उत्तम राठोड, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, श्री. नरेश गोमा हिंदोळे, सर्व सदस्य व सर्व विद्यार्थ्यांचे पालक यांच्या संयुक्त प्रयत्नातून 'किशोर मासिक वाचन' हा उपक्रम राबवण्यात आला.

शाळेतील बहुतांश विद्यार्थ्यांचे पालक आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मोलमजुरी करणारे आहेत. या पालकांना किशोर मासिकाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सर्व विद्यार्थ्यांसाठी पालकांनी 'किशोर' मासिकाची वार्षिक वर्गणी भरून नोंदणी केली आहे. यामुळे 'किशोर' मासिक अतिदुर्गम भागातही नियमितपणे पोस्टाने येऊ लागले आहे. 'किशोर' मासिकाचे वाचन होऊ लागले आहे. आता मुले आवडीने 'किशोर' मासिकाची वाट पाहतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होत असून वाचनात सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

आपला नम्र

**वेच्या रूध्या गावित**

मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, स्टेशन ठाकूरवाडी,
केंद्र-खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड
मो.: ८०८७५६५६३९



# न सुटणारे कोडे

हितगुज

एक प्रसिद्ध गणिततज्ज्ञ होता. एकदा तो एका खेळण्याच्या दुकानात गेला. त्याला आपल्या लहान मुलाला गणिती कोड्याचे खेळणे विकत घ्यायचे होते. दुकानदाराला त्या माणसाची ख्याती माहीत होती. मग त्याने एक कोडे असलेले खेळणे त्याला दिले. गणिततज्ज्ञाला पण या खेळण्याकडे बघून उत्सुकता वाटली. मग त्याने विचार केला की, हे कोडे मुलाला देण्यापूर्वी आपणही हे कोडे सोडवून पहावे. गणिततज्ज्ञ बराच वेळ प्रयत्न करत राहिला, पण कोडे काही सुटतच नव्हते. खूप प्रयत्न करूनही जमत नाही म्हटल्यावर तो वैतागला आणि दुकानदाराला म्हणाला, ''अहो, हे कसले कोडे आहे? मी एवढा हुशार गणिततज्ज्ञ असूनही मला हे कोडे सुटत नाही तर माझा लहान मुलगा ते कसे काय सोडवू शकेल?'' त्यावर दुकानदार स्मित करत म्हणाला, ''मुळात हे कोडेच चुकीचे आहे. त्यामुळे गणिततज्ज्ञ असो की, लहान मूल हे कोडे कुणालाच सोडवता येणार नाही. गणिततज्ज्ञ चिडले आणि ओरडले की, ''जर सोडवताच येत नसेल तर मग हे कोडे तयारच का केले?

त्या वेळी दुकानदार स्मित करीत म्हणाला, ''खरं तर हे कोडे मुलांना जीवनाची जाणीव करून देण्यासाठी आहे. त्यांना लहानपणापासून हे कळायला हवे की, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर असतेच असे नाही. सगळ्या गोष्टी तर्काच्या आधारावर सोडवल्या जाऊ शकतात, असेही नाही. जीवनात काही प्रश्न हे अनुत्तरीतही असू शकतात. प्रत्येक वेळी गणित किंवा तर्काच्या आधारे उत्तरे न शोधता काही वेळा विश्वास हादेखील उत्तराचा आधार असू शकतो. अनेकदा उत्तरापेक्षा सराव महत्त्वाचा असतो. एखादं कोडं न सुटल्याने आयुष्य काही थांबत नाही. जीवनाच्या प्रवासात अशा न सुटणाऱ्या अनेक कोड्यांचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे तुम्ही त्याला हे गणिती कोडे द्या. सोडवण्याचा प्रयत्न करू द्या. अपयशी होऊ द्या. या अपयशातून देखील तो खूप काही शिकणार आहे.''

**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**





# हीरकमहोत्सवी बालभारती

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, आपल्याला दरवर्षी नव्या इयत्तेत विविध विषयांची पाठ्यपुस्तके अभ्यासाला असतात. त्यांतील मराठी, इतिहास आणि तुमच्या आवडत्या इतर विषयांची पुस्तके तुम्ही आवडीने आधीच वाचून पाहत असता. कधी उन्हाळ्याच्या, दिवाळीच्या तर कधी रविवारच्या सुट्टीत ही पुस्तके तुम्ही आवडीने चाळून पाहता. त्यांतील धडे, कथा, कविता, चित्रे पाहिल्याशिवाय तुमच्या मनाचे समाधान होत नाही. त्या वेळी किती वाचू नि किती नको, असे तुम्हांला होत असते. त्यातच तुमचे ताई-दादा तुमच्या पुढील वर्गात असतील, तर तुम्ही त्यांची पुस्तकेसुद्धा त्यांच्याशी गोड बोलून, कधी भांडून तर कधी आईबाबांना सांगून मिळवता कारण नव्या वर्गाचे पुस्तक पाहताना, वाचताना मनात खूप उत्सुकता आणि आनंद असतो. त्याची तुलना जगातल्या कुठल्याच आनंदाशी करता येत नाही. ही पुस्तके वर्षभर तुमचे सोबती असतात. तुमचे आणि तुमच्या शिक्षकांचे जिवाभावाचे मित्रच असतात. या पुस्तकांप्रमाणेच तुमच्या आवडत्या 'किशोर' मासिकाचा अंकदेखील दर महिन्याला तुमच्या भेटीला येतो. दर महिन्याच्या 'किशोर' मासिकाच्या अंकाची देखील तुम्हांला तितकीच उत्सुकता असते नाही का ? तर तुमची ही पाठ्यपुस्तके आणि 'किशोर' मासिक एकाच ठिकाणी तयार होतात. तुमची ही लाडकी, आवडती पुस्तके तयार करणारी संस्था म्हणजे 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ' अर्थात तुमची लाडकी 'बालभारती'!

२७ जानेवारी १९६७ रोजी या संस्थेचा जन्म झाला. यंदा 'बालभारती'च्या स्थापनेला २७ जानेवारी रोजी ५९ वर्षे पूर्ण होत असून ती हीरकमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. २०२६ हे वर्ष बालभारतीचे हीरक महोत्सवी वर्ष आहे. बालमित्रांनो, जेव्हा एखाद्या व्यक्तीला, संस्थेला किंवा राष्ट्राला त्यांच्या स्थापनेपासून किंवा एखाद्या विशिष्ट घटनेला ६० वर्षे पूर्ण होतात, तेव्हा तो दिवस 'हीरक महोत्सव' म्हणून साजरा केला जातो.

'सा विद्या या विमुक्तये' असे बोधवाक्य असलेली 'बालभारती' ही संस्था आपल्या देशाच्या शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाची संस्था म्हणून ओळखली जाते. 'सा विद्या या विमुक्तये' म्हणजे 'जी विद्या मुक्ती देते, तीच खरी विद्या आहे'. हा एक संस्कृत श्लोक आहे, याचा अर्थ जे ज्ञान आपल्याला बंधनातून मुक्त करते तेच खरे ज्ञान आहे, तर इतर ज्ञान हे केवळ कौशल्ये आहेत. अक्षरओळखीपासून ते नामवंत साहित्यिकांची, विविध तज्ज्ञांची, विषयांची ओळख करून देत प्रत्येक मुलाला दरवर्षी नव्या विश्वाशी जोडत, वाचनाची आणि शिक्षणाची आवड लावण्याचे कार्य 'बालभारती' सातत्याने करत आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे माध्यम आहे, तर पाठ्यपुस्तक हे ज्ञानप्राप्ती व शिक्षणाचा प्रसार करण्याचे प्रमुख साधन आहे. पाठ्यपुस्तके हा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा विषय असतो. आपल्या मनाचा एक कोपरा आपण शिकलेल्या, शिकत असलेल्या पाठ्यपुस्तकांसाठी कायम आणि राखीव असतो. लहानपणी शिकलेल्या कथा, कविता, चित्रे यांचा एक विलोभनीय ठसा मनावर उमटलेला असतो.

पाठ्यपुस्तकांतून भाषेचे, साहित्याचे आणि वाचनाचे

संस्कार तर होतातच, शिवाय जीवनाचे, जगण्याचे अनेक संस्कारही याच पाठ्यपुस्तकांतून होत असतात. अशी ही आयुष्यभर साथसंगत करणारी, उत्तम संस्कारांची शिदोरी देणारी पाठ्यपुस्तके 'बालभारती'तच तयार होतात. तुमचे आई-बाबा, काका-काकू, आत्या-मावशी, ताई-दादा या सर्वांच्या आपली शाळा, शाळेतील शिक्षक आणि पाठ्यपुस्तकातील धडे, कथा, कविता, त्यांची चित्रे लक्षात असतात. काहींना तर पाठच असतात. ते सर्वजण आठवण आली की, या कविता आपल्याला घडाघडा म्हणून दाखवतात. अशा प्रकारे अनेक पिढ्यांवर बालभारतीच्या पुस्तकांचा संस्कार आहे. 'बालभारती'च्या अतूट धाग्याने विविध पिढ्या एकमेकांशी बांधल्या गेल्या आहेत.

दरवर्षी अंदाजे कोट्यवधी पुस्तकांची छपाई करून त्यांचे वितरण 'बालभारती'मार्फत केले जाते. पाठ्यपुस्तकांची निर्मिती ही खडतर आणि विलक्षण प्रक्रिया आहे. प्रतिवर्षी एकाच वेळी राज्यातील लाखांहून अधिक शाळांमधील शिक्षक, कोट्यवधी विद्यार्थी आणि तितकेच पालक यांच्याशी आपुलकीच्या अतूट धाग्यांनी 'बालभारती' जोडली गेली आहे.

## पाठ्यपुस्तक मंडळाची स्थापना

स्वातंत्र्यानंतरच्या देशातील शैक्षणिक वाटचाल सुरू करण्यासाठी अनेक अडचणींना, विविध प्रश्नांना सामोरे जावे लागले. कारण आपला देश विविध जाती, अनेक भाषा, विविध रूढी, परंपरा यांच्या वैविध्याने नटलेला, सजलेला होता. त्या वेळी विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक गरजा भागवण्यासाठी नेमके काय स्वीकारावे, काय स्वीकारू नये, याबाबत निश्चित दिशा आणि धोरण नव्हते. वेगवेगळ्या राज्यांतील भाषाविषयक धोरण, शैक्षणिक अभ्यासक्रम यांमध्ये एकसमान असे सूत्रही नव्हते; म्हणूनच भारताच्या शैक्षणिक धोरणाची आणि वाटचालीची पायाभूत दिशा ठरवण्यासाठी 'कोठारी आयोगाची' स्थापना करण्यात आली. या आयोगाने भारतीय शिक्षणक्षेत्रात क्रांती घडवून आणली.

'बालभारती' तथा पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्थापनेपूर्वी शाळांमध्ये खासगी प्रकाशकांची पुस्तके वापरात होती. या पुस्तकांचा दर्जा, किमतीमधील तफावत, त्यांची उपलब्धता या बाबींची दखल कोठारी आयोगाने घेतली. या सर्व प्रक्रियेचा बारकाईने अभ्यास केला. त्यानुसार दर्जेदार आणि रास्त किमतीमधील पुस्तके मुलांना वेळेत मिळावी यासाठी राज्याने स्वायत्त संस्था निर्माण करावी अशी शिफारस या आयोगाकडून करण्यात आली. शालेय पाठ्यपुस्तकांचे राष्टीयीकरण झाले. याच कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार २७ जानेवारी १९६७ रोजी 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ' तथा 'बालभारती' या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते २ फेब्रुवारी १९६७ रोजी  झाले. मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष या नात्याने तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांचे संस्था उभारणीत आणि मंडळाचे पहिले संचालक उत्तमराव सेवलेकर आणि पहिले नियंत्रक बापूराव नाईक यांचे संस्थेच्या प्रारंभीच्या वाटचालीत मोलाचे योगदान राहिले.

किशोर मित्र-मैत्रिणींनो, राज्यातील शालेय शिक्षण घेणाऱ्या पहिली ते बारावीपर्यंतच्या तुम्हां विद्यार्थ्यांसाठी भाषा व इतर सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करून वितरित करणे हे पाठ्यपुस्तक मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. 'मराठी बालभारती इयत्ता पहिली' हे मंडळाचे पहिले पुस्तक १९६८ साली प्रकाशित झाले. दहा भाषा माध्यमांतून सर्व विषयांची पाठ्यपुस्तके तयार करणारे पाठ्यपुस्तक मंडळ हे बालभारतीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. १९६८ पासून पाठ्यपुस्तक मंडळ दर्जेदार, संस्कारक्षम आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी पाठ्यपुस्तके तुम्हां विद्यार्थ्यांना अल्प किमतीत उपलब्ध करून देत आहे. मागील साठ वर्षांच्या काळात नवीन शैक्षणिक विचारप्रणाली, कालसुसंगत शैक्षणिक धोरणे, नवीन अध्ययन-अध्यापन पद्धती अशा विविध बाबींचा विचार करून पुस्तकांच्या स्वरूपात, आशयात अनेक बदल करण्यात आले आहेत. कालानुरूप बदलाची ही प्रक्रिया आजही सुरू आहे.

## बालभारती या नावामागील रंजक गोष्ट

संस्थेचे मूळ नाव 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ' असे असले, तरी 'बालभारती' या नावाने प्रकाशित होणारी भाषेची पाठ्यपुस्तके बालक - पालक - शिक्षक यांच्यामध्ये अल्पावधीतच इतकी लोकप्रिय झाली, की पाठ्यपुस्तक मंडळ 'बालभारती' याच नावाने ओळखले जाऊ




लागले.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राचा कणा असणारी बालभारती ही संस्था उभी राहिली आणि आता या छोट्याशा रोपट्याचे महावृक्षात रूपांतर झाले आहे. 'बालभारती' नावाप्रमाणेच 'बालभारती'च्या मुखपृष्ठाची आणि बोधचिन्हाची पण गमतीदार गोष्ट आहे. झाले असे की, शिकणाऱ्या मुलांची मानसिकता ओळखून मूळ उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी 'बालभारती'ने कंबर कसली. या कामी अनेक मान्यवर लेखक, आणि चित्रकारांचे मोलाचे साहाय्य लाभले. यात प्रसिद्ध चित्रकार दिनानाथ दलाल यांनी इयत्ता पहिलीच्या भाषेच्या पुस्तकाचे मुखपृष्ठ काढले होते. मुखपृष्ठावरील भावाबहिणीचे हे चित्र एवढे सुंदर आणि प्रभावी झाले की हेच चित्र 'बालभारती'ची कायमस्वरूपी ओळख ठरली.

पाठ्यपुस्तक प्रकाशन क्षेत्रातील एक पायाभूत, स्वायत्त संस्था असा 'बालभारती'चा उल्लेख करावा लागेल. मंडळाने स्थापनेपासूनच संस्कारक्षम, आकर्षक व दर्जेदार पाठ्यपुस्तके तयार करण्याचे व्रत घेतले. अनेक अडचणींवर मात करून शिक्षण क्षेत्रातील पाठ्यपुस्तक प्रकाशनाचा पाया मजबूत केला. निव्वळ मुलांवरील प्रेमापोटी राज्यातल्या अनेक ख्यातनाम लेखक, कलावंत आणि विचारवंतांनी 'बालभारती'च्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. कल्पना, कार्यक्षमता व कर्तृत्व यांचा एक सुंदर त्रिवेणी संगम मंडळाच्या आजवरच्या प्रवासात दिसून येतो.

### पाठ्यपुस्तक मंडळाची रचना

तुमच्या दप्तरात रोज असणाऱ्या या पुस्तकाची निर्मिती ही अभ्यासपूर्वक आणि कष्टपूर्वक केलेली असते. ही पुस्तके तयार करण्यासाठी अनेक तज्ज्ञ, अभ्यासक, चित्रकार सातत्याने काम करत असतात. पाठ्यपुस्तके तयार करण्याचे मुख्य काम विद्या विभागात केले जाते. विद्या विभागांतर्गत मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, सिंधी, तेलुगु, गुजराती, तमीळ आणि बंगाली या दहा भाषा आणि इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण असे एकूण १६ विभाग आहेत. सर्व विषयांसाठी म्हणजे भाषा, गणित, भूगोल, विज्ञान, इतिहास, नागरिकशास्त्र या विषयांसाठी स्वतंत्र विभाग असलेल्या वेगवेगळ्या विषय समित्या




काम करत असतात. त्या त्या विषयाचे अभ्यासक, तज्ज्ञ, शिक्षक, समाजात अन्य क्षेत्रांत महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या व्यक्ती त्या समितींमध्ये असतात.

पाठ्यपुस्तके तयार करणे ही जटिल, गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. तुम्हां मुलांचा वयोगट, त्यांचे भावविश्व, त्यांची आकलन क्षमता, मजकुराची काठिण्यपातळी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन पाठ्यविषयांची निवड करणे आणि सोप्या भाषेत धड्यांच्या स्वरूपात त्यांचे लेखन करणे हे एक प्रकारचे कष्टदायक आणि अभ्यासपूर्ण काम असते. सर्वप्रथम त्या त्या विषयाचा अभ्यासक्रम तयार केला जातो. तुमच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कौशल्यांचा विकास घडवून आणणे हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून हे अभ्यासक्रम अनेक तज्ज्ञ तयार करतात. या अभ्यासक्रमावर आधारित उद्दिष्टांनुसार प्रत्येक विषयाचा स्वतंत्र पाठ्यक्रम बारकाईने तयार केला जातो. त्यानुसार सर्व विषयांचे अभ्यासक्रम तयार झाल्यावर पाठ्यपुस्तक निर्मितीचे काम सुरू केले जाते. त्यातील मजकूर, मांडणी, रचना अतिशय व्यवस्थित, काळजीपूर्वक तपासून घेतात. या सर्वच पाठ्यपुस्तकांची भाषा सोपी, सुटसुटीत आणि विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेनुसार ठेवण्यावर जाणीवपूर्वक भर दिला जातो.

## अमराठी पुस्तके

आपल्या राज्यात मराठी, हिंदी, इंग्रजीबरोबरच अमराठी माध्यमांच्या शाळांची संख्या लक्षणीय आहे. हिंदी, उर्दू, कन्नड, सिंधी, गुजराती, तेलुगु, तमीळ, बंगाली अशा मातृभाषा असणारे अनेक अमराठी भाषक महाराष्ट्रात राहतात. त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारून शासनाने अमराठी माध्यमांच्या शाळा सुरू करण्यास राज्यात परवानगी दिली आहे. या मुलांसाठी त्यांच्या मातृभाषेतील पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम देखील 'बालभारती'च करते. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित इत्यादी विषयांची पुस्तके मराठीतून तयार झाल्यानंतर ती अन्य अमराठी भाषांत अनुवादित केली जातात. हीच पुस्तके या शाळांमध्ये अभ्यासली जातात.

## पाठ्येतर प्रकाशने

पाठ्यपुस्तकांची निर्मिती व वितरण हे पाठ्यपुस्तक मंडळाचे मुख्य कार्य असले, तरी मंडळाने शिक्षक, तुम्ही विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी अवांतर वाचनासाठी अन्य उपयुक्त साहित्याचीही निर्मिती केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, छत्रपती शाहू महाराज गौरवग्रंथ, उत्तम संस्कारकथा, ग्रामगीता, गांधीजींचे चरित्र, कथा स्वातंत्र्याची, शिल्पकार स्वातंत्र्याचे, स्फूर्तिगीते, माहीत आहे का तुला?, मराठी शब्दार्थकोश, गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची, किशोर गोष्टी, ऐतिहासिक कथामाला, राज्यशास्त्र परिभाषा कोश, बालगोष्टी, बालगीते इत्यादी पाठ्येतर प्रकाशनांना वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

## किशोर (मुलांचे मासिक)

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीच्या दिवशी (१४ नोव्हेंबर १९७१ रोजी) ८ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी 'किशोर' हे मासिक मंडळाने सुरू केले. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना अभ्यासक्रमाबाहेरचे ज्ञान मिळावे, त्यांच्या संवेदनशील मनावर उत्तम मूल्यांचे संस्कार व्हावेत ही उद्दिष्टे ठेवून 'किशोर' मासिक चालवले जाते. गेल्या ५५ वर्षांत 'किशोर' मासिकाने अनेक पिढ्यांवर वाचनाचे ज्ञान-विज्ञानाचे व मूल्यांचे संस्कार केले आहेत. अनेक चित्रकार, कवी लेखक यांना मासिकाने घडवले आहे. 'किशोर'मधील उत्तम निवडक साहित्य १४ खंडांत प्रकाशित झाले आहे. हे साहित्य अतिशय वाचनीय असून तुम्ही ते जरूर वाचा. कोरोनाच्या काळात 'किशोर'ची ३३ हजार पृष्ठे जगभरातील मराठी वाचकांसाठी मोफत उपलब्ध करून देण्याचे श्रेय देखील बालभारतीस जाते. केवळ तुमच्या प्रेमापोटी कोरोनाच्या काळात मुलांना, पालकांना एकटे पडू न देण्यासाठी किशोरने विशेष कष्ट घेतले. आता ही सर्व पुस्तके तुम्हांला www.ebalbharati.in या संकेतस्थळावर डिजिटल स्वरूपातही उपलब्ध आहेत. ती तुम्ही जरूर पहा.

## अद्ययावत ग्रंथालय-

प्रारंभी पाठ्यपुस्तके, 'किशोर' सारखी इतर प्रकाशने यांसाठी संदर्भाची गरज पडली होती, म्हणून 'बालभारती'ने स्वतःचे समृद्ध असे ग्रंथालय विकसित केले. ग्रंथालयात एक लाख पासष्ट हजार पुस्तके, पाच हजार कोश, असंख्य नकाशे, नॅशनल जिओग्राफिक, नेचर, यांसारखी महागडी मासिके असे सर्व काही उपलब्ध आहे. आताही पाठ्यपुस्तकांची निर्मिती करताना अनेक नवनवीन संदर्भग्रंथांची आवश्यकता भासते. अद्ययावत आणि अत्यंत दुर्मीळ असे अनेक संदर्भग्रंथ इथे उपलब्ध आहेत. 'बालभारती'त आठ भाषांमध्ये पाठ्यपुस्तके तयार होत असल्यामुळे ग्रंथालयात आठही भाषांमधील विपुल ग्रंथसंपदा आहे. प्रतिवर्षी नवनवीन ग्रंथांची यात भर पडत असते. ग्रंथांबरोबरच आठ भाषांमधील व अन्य विदेशी भाषांमधील असंख्य नियतकालिकेही मागवली जातात.

## ई-बालभारती (e-Balbharati) आणि तंत्रज्ञानाचा वापर -

बालभारतीचे डिजिटल युगातील हे सर्वांत महत्त्वाचे पाऊल होते. बालभारतीची सर्व पाठ्यपुस्तके ऑनलाईन (PDF स्वरूपात) विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे तुम्हां विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पुस्तके कधीही, कुठेही मिळवणे शक्य झाले.

**QR कोडचा वापर :** प्रत्येक पाठात किंवा धड्यात क्यूआर (QR) कोड छापण्यात आले. हे कोड स्कॅन करून तुम्ही अतिरिक्त शैक्षणिक संसाधने, ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स आणि सराव चाचण्या यांचा फायदा घेऊ शकलात आणि यामुळे शिक्षण अधिक सोपे व संवादी झाले.

**DIKSHA App:** भारत सरकारच्या 'दीक्षा' (DIKSHA) प्लॅटफॉर्मवर बालभारतीची संसाधने उपलब्ध करून दिली गेली, ज्यामुळे राष्ट्रीय स्तरावर या संसाधनांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला.

## 'व्हर्चुअल क्लासरूम' प्रकल्प -

शहरी भागाप्रमाणेच दुर्गम भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी 'व्हर्चुअल क्लासरूम' हा पर्याय खूपच प्रभावी ठरत आहे. अतिदुर्गम भागात असलेल्या शाळांमध्ये 'व्हर्चुअल क्लासरूम' हा प्रकल्प 'बालभारती'मार्फत राबवण्याचे ठरवण्यात आले. या संस्थेच्या अंतर्गत, बदलत्या काळानुरूप शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी 'ई-बालभारती' या विभागाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०२० मध्ये ई-बालभारतीच्या माध्यमातून अतिदुर्गम भागातील ७६१ शाळा या प्रकल्पांतर्गत जोडण्यात आल्या. अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना या प्रकल्पामुळे उत्तम

विषय तज्ज्ञांकडून मार्गदर्शन देण्याची संधी बालभारतीच्या माध्यमातून शासनाने उपलब्ध करून दिली आहे. बालभारतीने या प्रकल्पांतर्गत तीन अत्याधुनिक स्टुडिओंची निर्मिती केली असून त्या स्टुडिओच्या माध्यमातून आणि 'एस.सी.ई.आर.टी.' या संस्थेच्या सहयोगातून वेगवेगळ्या विषयांचे तज्ज्ञ इयत्ता पहिली ते इयत्ता दहावीचे शिक्षण विद्यार्थ्यांना देत आहेत.

**नवीन अभ्यासक्रम -**

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' च्या अनुषंगाने शालेय वर्ष २०२६-२७ मध्ये महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळामार्फत (बालभारती) इयत्ता ३ री, ४ थी, व ६वीची पाठ्यपुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. २०२५ मध्ये इयत्ता पहिलीसाठीची पाठ्यपुस्तके प्रकाशित केली आहेत. सध्या २०२६-२०२७ मध्ये प्रकाशित करावयाची इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या पाठ्यपुस्तकांच्या लेखनाचे काम पाठ्यपुस्तक मंडळात सुरू आहे.

**'बालभारती'चे सामाजिक योगदान आणि महत्त्व**

'बालभारती'चे महत्त्व केवळ पाठ्यपुस्तके छापण्यापुरते मर्यादित नाही. या संस्थेने

**समानता :** बालभारतीने राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समान, दर्जेदार, किफायतशीर दरात आणि एकाच वेळी पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देऊन शैक्षणिक समानता आणण्याचा प्रयत्न केला.

**भाषेचा विकास :** मंडळाने मराठीसह इतर प्रादेशिक भाषांमधील पाठ्यपुस्तके तयार करून भाषिक विकासाला चालना दिली.

**सांस्कृतिक जडणघडण :** पाठ्यपुस्तकांमधून महाराष्ट्राचा इतिहास, भूगोल, संस्कृती आणि थोर व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देऊन विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली.

'बालभारती'ने महाराष्ट्रातील कोट्यवधी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत आजवर मोलाचे योगदान दिले आहे. संपूर्ण देशात 'बालभारती'ची रचना आणि कार्यपद्धती आदर्शवत मानली जाते. गुणवत्ता व दर्जा याबाबतीत सुद्धा मंडळाची पाठ्यपुस्तके मागे नाहीत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मंडळनिर्मित पाठ्यपुस्तके गुणवत्ता व दर्जा याबाबतीतही उत्कृष्ट आहेत. 'किशोर' या मासिकालाही भारत सरकारचे गुणवत्ता प्रमाणपत्र व मुद्रण स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त झाले आहे. आजही देश-विदेशांतील मंडळे 'बालभारती'ला भेट देण्यासाठी येतात आणि येथील रचना आणि कार्यपद्धती त्यांच्याकडे सुरू करण्याच्या दृष्टीने विचार करतात, यातच 'बालभारती'चे यश दडलेले आहे.

**सद्यस्थिती आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (२०२० ते आजपर्यंत) :** गेल्या काही वर्षांपासून, महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेत मोठे आणि क्रांतिकारी बदल होत आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) :** एनईपी २०२० मुळे शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल सुचवण्यात आले आहेत. महाराष्ट्रात या धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने सुरू आहे आणि 'बालभारती' यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**कौशल्य आणि अनुभवाधिष्ठित शिक्षण:** केवळ घोकंपट्टीवर भर न देता, विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, व्यावहारिक ज्ञान आणि अनुभवाधिष्ठित शिक्षण (experiential learning) रुजवण्याचे उद्दिष्ट आहे.

**आव्हाने आणि पुढील वाटचाल -**

बालभारतीने शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) नुसार अभ्यासक्रमात सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. बदलत्या काळानुसार आता 'बालभारती'ही बदलतं आहे. आधुनिक ज्ञान-तंत्रज्ञान यांमुळे पारंपरिक पाठ्यपुस्तकांचे स्वरूप बदलण्यासाठी व नवी आव्हाने पेलण्यासाठी 'बालभारती' सज्ज झाली आहे. आजमितीला 'बालभारती'ची ६० वर्षांची वाटचाल ही एका अर्थाने महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचीच वाटचाल आहे. या प्रवासात, 'बालभारती'ने अनेक पिढ्यांना ज्ञानाचे धडे दिले आहेत. महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनलेल्या या संस्थेची वाटचाल प्रेरणादायी आहे. आगामी काळातही 'बालभारती' शिक्षणक्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत राहील असा विश्वास वाटतो.


**किरण केंद्रे**

कार्यकारी संपादक (किशोर) व

जनसंपर्क अधिकारी (बालभारती)

**संपर्क :** ७३०३४२८५५५

बालकादंबरी

भाग १

# नावामागची गोष्ट

दासू वैद्य

## लाडेलप्पा

गावची जत्रा नुकतीच संपली होती. मन अजून आकाशपाळण्यातच होतं. सालाबादप्रमाणे तो लाल बेगडाचा चष्मा घालून, तोंडांने पुंगी वाजवत जत्रेत बरीच खरेदी केली होती. गोडी शेवेची चव जिभेवर होतीच. जत्रेमुळं तीन-चार दिवस शाळेला बुट्टी मारलेली. आज सोमवार. शाळेत जायला जीवावर आलं होतं. पण आज जावं लागणार होतं. भल्या सकाळी आईने गरम गरम पानगा करून दिला. गुळ-तुपासोबत पानगा खाऊन रमतगमत शाळेची वाट धरली. वर्गात आलो. प्रार्थना चुकल्यामुळे घाबरतच मारकुट्या सरांना टाळून वर्गात येऊन बसलो. सर हजेरी घेत होते.

'टेकाळे सुरेश गणपतराव'

'उपस्थित'

'टेके सुभाष किसनराव'

'प्रेझेंट सर'



'उफाडे विकास मधुकर'

'यस सर'

इथं मात्र सरांनी संपूर्ण नाव घेतलं नाही.

'लाडेलप्पाऽऽ'

माझं लक्ष नव्हतं. मी आकाशपाळण्यातच होतो. शेजारच्या मुलानं मला हलवलं.

सरांनी पुन्हा जोरात नाव पुकारलं

'लाडेलप्पाऽऽ'

मी घाईतच उभा राहिलो आणि प्रतिसाद दिला

'उपऽऽस्थित सऽऽर'

नाकावरचा चष्मा कपाळावर सरकवत सर बोलले,

'लाडेलप्पा, जरा वर्गातही लक्ष देत जा'

लाडेलप्पा हे काही माझं खरं नाव नाही. तुम्हांला आश्चर्य वाटेल किंवा खोटंही

वाटेल. वर्गातल्या हजेरीत माझं पूर्ण नाव आहे म्हणजे असतंच. पण आजकाल हजेरी घेताना सर्व गुरुजनवर्ग माझं संपूर्ण नाव उच्चारण्याऐवजी चक्क 'लाडेलप्पाऽऽ' असं पुकारतात आणि मी 'उपऽऽस्थित' असा होकार भरतो. मी तसा बडबड्या... धडपड्या मुलगा. मला गोष्टी ऐकायला नि सांगायला खूऽऽप आवडतं. म्हणजे कुणी एका हातात गोष्ट आणि दुसऱ्या हातात बुंदीचा लाडू धरला तर मी लाडू घेईन पण लाडू खाऊन झाल्यावर मला वाईट वाटतं. कारण लाडू खाल्ला की संपून जातो पण गोष्ट एकदा ऐकली की संपत नाही. गोष्ट ऐकल्यावर पुन्हा दुसऱ्याला सांगता येते. आणि दुसरी गंमत म्हणजे, गोष्ट सांगताना आपल्याला तिखट -मीठ लावून सांगता येते.

शब्दांची खमंग फोडणी देता येते. आमची म्हणीआजी म्हणजे, बोलताना म्हणी वापरणारी आजी म्हणते, 'साप निघतो करंगळीएवढा नि सांगत सांगत होतो मांडीएवढा' म्हणजे एखादी घटना फुगवून सांगण्याची माणसाला सवय असतेच. कैरीची फोड असू दे; नाही तर गोष्ट असू दे, तिखट-मीठ लावल्याशिवाय मज्जाच येत नाही.

लाडेलप्पा हेच मुळात खरं नाव नाही. वर पुन्हा लाडेलप्पाचं कुणी 'लाडू' केलं, कुणी लड्डू केलं, कुणी 'लाड्या' केलं. आई मात्र आधीपासूनच 'लाडोबा' म्हणते. वर्गात, शाळेत, घरात आणि गावातही 'लाडेलप्पा' नाव चांगलंच रुळलं होतं. पण तुमच्या डोक्यावर एक प्रश्न गुंईगुंई करतच असेल. लाडेलप्पा नाव पडलं कसं? जऽऽरा दम धरा.. सांगतो. अशी विचित्र नावं पडतात ना तेव्हा त्यामागे एक गोष्ट असते, असं म्हणीआजी सांगते. आमच्या गावात वेशीवर एक



पिंपळ आहे. त्याला 'चोर पिंपळ' म्हणतात. आता पिंपळ कशाची चोरी करणार? सावलीला बसणाऱ्या लोकांचे फेटे चोरणार की त्यांच्या चपला चोरणार? बिचारा जमिनीतून पाणी नि आभाळातून सूर्यप्रकाश घेऊन मोठ्ठा झालाय. निमूट उभा असतो एकटाच. दीडशे-दोनशे वर्षांचा नक्की असेल. एखादया वयोवृद्ध माणसासारखा वेशीवर उभा आहे; जणू गावाची रखवाली करतोय! पण गावातच काय, आजूबाजूच्या गावातही त्या पिंपळाला 'चोर पिंपळ' असंच म्हणतात. आमच्या म्हणीआजीच्या बटव्यात नुसत्या म्हणीच नाहीत तर अशा प्रश्नांची उत्तरंही हमखास असतात. चोर पिंपळ नावाबद्दल एकदा मी तिला विचारलं तर तिनं सांगितलं, ''अरे लाडू, तेव्हा गावात खूप चोऱ्या व्हायच्या, दरोडे पडायचे. चोरी गावात होऊ दे नाही तर आजूबाजूच्या गावात होऊ दे. चोरी केलेला माल घेऊन रात्री चोर या पिंपळाच्या झाडाखाली येत. चोरी केलेल्या मालाची वाटणी या पिंपळाखाली होई. म्हणून या पिंपळाला 'चोर पिंपळ' असं नाव पडलं.'' आजी अशी अद्भुत माहिती सांगायची. पण मी मात्र तिथून सुसाट पळत सुटायचो. कारण पिंपळाची ही भन्नाट गोष्ट मला मित्रांना सांगायची घाई झालेली असे.

अशीच अजून एक नाव रूढ होण्याची गंमत आहे. आमच्या वर्गात एक अप्सर शेख नावाचा मुलगा होता. कधीमधी शाळेत यायचा. आमचे देशमुख सर मध्येच आमचं मराठी वाचन घ्यायचे. मराठीचं पुस्तक काढायचं आणि एकानंतर एकाने वाचायचं. त्या दिवशी वर्गात वाचन सुरू होतं. वाचताना अप्सरचा नंबर आला.

अप्सर उभं राहून वाचू लागला, 'एका गावात एक तडे होते. तड्यात खूप पाणी होते. तड्यात दोन बेडूक राहत होते..' अप्सर वाचायचा थांबला कारण सगळा वर्ग खोखो हसत होता. 'तड्यात पाणी होते? तड्यात बेडूक होते...' हे तड्यात.. तड्यात ऐकून मुलं हसत होती. गंमत काय होती..अप्सर होता हिंदी भाषक. त्याची हिंदी उर्दू मिश्रित असे. त्यामुळे त्याला 'ळ' चा उच्चारच येत नव्हता. म्हणून तो 'तळ्यात'ला 'तड्यात' वाचत होता.

त्यामुळे वर्गात हशा पिकला होता. खरं तर कुणाच्या चुकीला असं हसू नये. पण हसण्यासाठी आणि नावं ठेवण्यासाठीच आमचा वर्ग संपूर्ण शाळेत प्रसिद्ध होता. अप्सरच्या 'तड्याला' हसले इथपर्यंत ठीक होतं पण पुढं अप्सरचं नावच 'तड्यात-मड्यात' असं पडलं. आम्ही विचारायचो, अरे आज 'तड्यात-मड्यात' आला नाही का? गावात एक गुजरी नावाचा चौक होता. गुजरी म्हणजे छोटा बाजार. या गुजरीत 'तड्यात-मड्यात'ची (म्हणजे अप्सरची) केळाची भट्टी होती. केळीचे घड नीट ठेवण्यासाठी 'तड्यात-मड्यात' वडलांना मदत करायचा. गुजरीत गेल्यावर केळीच्या भट्टीवर 'तड्यात-मड्यात' दिसला की मी हाक मारायचो, ''एऽऽ तड्यात-मड्यात..'' त्यालाही हे चिडवणं वाटायचं नाही. तोही हसून प्रतिसाद दयायचा. कधी तर तड्यात-मड्यातचे दाढीवाले वडील एक पिवळं धम्मक पिकलेलं केळं दयायचे. वडलांना केळीच्या भट्टीवर मदत करणारा 'तड्यात-मड्यात' पुढे शाळेत येईनासा झाला. वडलांना तो पूर्णवेळ मदत करायचा. पण तळ्यातल्या दोन बेडकांपेक्षा 'तड्यात-मड्यात' आमच्या कायम लक्षात राहिला.

तो चोर पिंपळ लक्षात आहे नं. त्या पिंपळाच्या अलीकडे मारोतीचं मंदिर म्हणजे वेशीवरचा मारोती हो. त्या मंदिराच्या डाव्या बाजूला दोन घरं सोडलं की एक कौलारू घर आहे. घर कुणाचं म्हणजे त्यांचं नाव काय? त्यांचं नाव तूपसमिंद्रे! आहे की नाही मज्जेशीर नाव. आमच्या म्हणीआजी म्हणतात तशी प्रत्येक नावामागे एक गोष्ट असतेच. तसा समुद्र तर आमच्या गावापासून खूऽऽप लांब म्हणजे थेट मुंबईलाच होता. मग इथे समुद्राचा काय बरं संबंध? या तूपसमिंद्रे नावामागे काय बरं गोष्ट असेल? तर गोष्ट सांगितली म्हणीआजीने, ''अरे लाडू, जुन्या काळात त्यांच्या घरी चांगलं दूधदुभतं होतं. गायी-म्हशींनी भरलेला गोठा होता. दर आठ दिवसाला ताक व्हायचं, लोणी काढायचे, चरवीभर कढवलेलं तूप होत असे. त्या घरात प्रेमळ म्हातारी



आजीबाई होती. भांडं घेऊन आलेल्या लोकांना ताक वाटायची. त्याशिवाय गावात कुणी बाळंतीण असेल तर म्हातारी आजी तिच्या घरी तांब्याभर लोणकढत तूप पाठवायची. बाळ-बाळंतिणीला तुपाचा पौष्टिक खुराक मिळायचा. घरोघर तूप वाटणाऱ्या आजीबद्दल गौरवाने बोललं जाई. म्हाताऱ्या आजीच्या प्रेमळ स्वभावाचं कौतुक होई. बायका गप्पागोष्टी करताना म्हणत, 'माय म्हातारीला साऱ्या गावाची माया. गावातले अर्धी लेकरं तिच्या तुपावरच मोठी झाली. त्या म्हातारीच्या घरी तुपाचा समुंदर हाय गं माय' ज्याच्या घरी तुपाचा समुंदर आहे ते झाले तूपसमिंद्रे!''

म्हणीआजीच्या भाषेत सांगायचं तर, 'गेले शिकारीला अन् बसले ओकारीला' असं माझं झालंय. 'लाडेलप्पा' नावामागची गोष्ट सांगताना या दुसऱ्याच गोष्टी 'बिन बुलाये मेहमान' होऊन आल्या. तर लाडेलप्पा नाव पडलं त्यालाही आता चारेक वर्षे झालीत. म्हणजे तेव्हा मी चौथीत असेन. गावातल्या अपरंपार स्वामींची जत्रा संपली होती. जत्रेत आम्ही खूऽऽप मज्जा केली होती. म्हणजे आकाश पाळण्यात बसलो, पडद्याच्या फोटो स्टुडिओत मोटारसायकलवर बसून फोटो काढला, इतरांचे कान किट्ट करणारी पुंगी घेतली. बासरी घेतली. बेगडाचा चष्मा घेतला. रेवड्या-गोडीशेव खाल्ली. आणि हो एक लाडेलप्पा घेतला. लाडेलप्पा म्हणजे एक चमकीचा कागद

लावलेला मातीचा गोळा, त्याला एक लांब रबर जोडलेले. रबर हातात धरून तो गोळा हवेत सोडला की रबर ताणले जाई. तो चमकीला गोळा लांब जाऊन परत आपल्याकडे येई. हा खेळ चालता चालताही सहज खेळता येई. त्यामुळे मला हा 'लाडेलप्पा' भारी आवडायचा. बरेचदा हा लाडेलप्पा झोपतानाही माझ्या चड्डीच्या खिशातच असे. जत्रा संपली. जड पावलांनी शाळेत आलो. वर्गात मराठीच्या बाई कविता शिकवत होत्या,

**'या बालांनो या रे या, लवकर भरभर सारे या**
**मजा करा रे मजा करा, आज दिवस तुमचा समजा'**

कविता छान होती. कवितेतून बाई बोलवतही होत्या. पण मन अजून जत्रेतच रेंगाळत होते. माझ्या खिशात बरेचदा भाजलेले चिंचोके, खोबरं, चिंचा, शेंगा, बोरं असं काहीबाही असे. सवयीने मी खिशात हात घातला. तर खिशात चक्क लाडेलप्पा होता. त्याच्या स्पर्शानंही बरं वाटलं. पण माझी चुळबुळ पाहून बाईंनी मला उठवलं, ''काय चाललंय रे तुझं? वर्गात लक्ष नाहीए. खिशात काये तुझ्या?'' मी एकदम चपापलो. खरंच माझं वर्गात लक्ष नव्हतं. मी, ''काही नाही बाई, काही नाही बाई'' असं गरीब होऊन म्हणत होतो. पण बाईंनी खिशाची झडती घेतली. लाडेलप्पा बाहेर काढला. त्यांनी मला दरडावून विचारलं,

''हे काय आहे?''

मी प्रांजळपणे उत्तर दिलं, ''लाडेलप्पा''

सगळा वर्ग खोखो हसला. मी खाली मान घालून उभा होतो. पुढं तर सगळे मला 'लाडेलप्पा' असंच चिडवू लागले.

मला खूप राग यायचा. शाळेत जायलाच नको वाटायचं. मी एकटा एकटा राहू लागलो, गप्प गप्प बसू लागलो. माझ्यात झालेला बिघाड म्हणीआजीच्या लक्षात आला. एक दिवस ती माझ्या जवळ आली. माझ्या डोक्यातून तिने हात फिरवला. तिच्या उबदार हातांचा स्पर्श होताच मला रडू आलं. तिनं मला छातीशी घट्ट धरलं, माझे डोळे पुसले. पेंडखजूर खायला दिली. मग मी तिला वर्गात घडलेलं, आणि मुलं कसं चिडवतात ते सारं सारं सांगून टाकलं.

म्हणीआजी समजावू लागली, ''अरे, आपण सगळेच 'लाडेलप्पा' असतो. त्यात चिडायचं कशाला. प्रत्येक माणूस कामासाठी बाहेर जातो पुन्हा लाडेलप्पासारखा घरी परत येतो की नाही. सूर्य –चंद्र सुद्धा जाणारे –परत येणारे लाडेलप्पाच आहेत. ते जाऊ दे. तुमच्या वर्गात इतरांना हसताना–चिडवताना तू मजा घेतोस नं.. मग तुझीही कोणीतरी मजा घेणारच. चिडतो कशाला. लाडेलप्पा ही तुला मिळालेली पदवी समज. 'लाडेलप्पा' हे किती सुंदर नाव आहे रे. मला जर तेव्हा सुचलं असतं तर तुझं नाव मी लाडेलप्पाच ठेवलं असतं.'' झालं म्हणीआजीचा एवढा डोस मला पुरेसा होता. कुणी 'लाडेलप्पा' म्हणलं तर मला राग येईनासा झाला. तेव्हापासून मी 'लाडेलप्पा' झालो.

(क्रमशः)

**संपर्क : ९४०३५८४१११**

'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक हेमंत बाबर यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – अनुराधा ओक.

'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Hemant Babar, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.
* Editor - Anuradha Oak.

# क्रांतीज्योती

उत्तमराव अरखराव




क्रांती ज्योत बनून
ज्ञान प्रकाश दिला
भोळ्या समजुतीला
पूर्ण विराम मिळाला ।।१।।

माया ममता शिकविली
स्त्रियांना साक्षर करून
समाज कंटकांना धडा
दूरदृष्टी कल्पनेतून ।।२।।

जीवन विकास साधला
समाज बांधिलकीतून
असंख्य अबला शिकल्या
तुझ्या मायेच्या प्रेरणेतून ।।३।।

अमर कार्य म्हणून
इतिहासी नाव गाजले
अपार संघर्षाने
स्त्रीजीवन घडविले ।।४।।

संपर्क : ९३७३८६०७३०



भाग १

डॉ. नंदू मुलमुले

# श्यामली

किशोर मित्र – मैत्रिणींनो,

आपले मन ही अगाध गोष्ट आहे. ज्याला मनावर नियंत्रण मिळवता येते, त्याला आयुष्यात यश मिळवता येते. आपल्या मनाच्या खोलात जाणे, त्याला समजून घेणे ही महत्त्वाची बाब आहे. कारण आपण जशी शरीराची काळजी घेतो ना, तशीच मनाची काळजी घेणे, मनाची सातत्याने मशागत करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मन प्रसन्न असणे, मन प्रसन्न करणे ही अतिशय गरजेची बाब आहे. प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ आणि लेखक **डॉ. नंदू मुलमुले** हे आपल्याला मनाच्या अशा अनेक रंजक गोष्टी **'सांग रे मना'** या सदरातून सोप्या, संवादी भाषेत उलगडून दाखवणार आहेत.




‘‘सारू, ए सारू, अगं ऊठ बेटा, शाळेची वेळ झाली,’’ आई उठवायला लागली तशी सारिका उठून बसली.

खरं तर ती झोपेत नव्हती, सकाळी सहापासून जागीच होती, पण उठू वाटत नव्हतं. रात्री तिला एक भीतीदायक स्वप्न पडलं होतं, ते अजून मनात रेंगाळत होतं. तिची फायनल परीक्षा आहे सातवीची, ती विसरून गेलीय. आठवलं तसं धावत सुटली, तर पायच उचलेनात. अचानक सारी मुले दारात येतात, आणि तिच्याकडे बोट दाखवून ओरडू लागतात, ‘‘सावळे, ए सावळे! डोक्याने बावळी, रूपाने कावळी, आली रे आली, आली आमची सावळी,’’ आणि टाळ्या पिटू लागतात. ती तोंड लपवून पळत सुटते. झोपेतून जागी होते.

सावळ्या रंगामुळे सारिकाला वर्गात ‘सावळी’ नाव पडलं होतं. कुणीच तिला सारिका म्हणत नसे, तिची आई सोडून. कितीही अभ्यास करा, कितीही छान उत्तरं लिहा, वर्गात तिची ओळख सावळी. बाजूला बसणाऱ्या पूजाकडे साऱ्यांचे लक्ष, कारण ती गोरी! सारिकाला शाळेत जावेसे वाटत नसे. खरंतर तिला विज्ञान, गणित, जीवशास्त्र खूप आवडीचे, मात्र तिला सतत ‘सावळी’ नावाने बोलावणाऱ्या मुलांमध्ये जायला ती नाखूष असे.

आजही तिने दप्तर घेतले, नाखुशीने शाळेत निघाली.

शाळा तीन किलोमीटर दूर, रस्त्यात मध्येच दाट झाडी. त्यातून निघायची एक पाऊलवाट, शाळेच्या बाजूने वेगळ्याच दिशेला. तिची नजर गेली त्या पाऊलवाटेकडे. त्या जंगलातून बासरीचा गोड आवाज येऊ लागला. कोण वाजवतेय इतकी सुंदर बासरी?

सारिकेने एकच पाऊल पुढे टाकले आणि पाहते तो काय? वटवृक्षाला टेकून साक्षात कृष्णकन्हैया उभा! एक पाऊल दुमडलेले, केसांत मोरपीस, ओठाशी बासरी आणि चेहऱ्यावर मिश्कील हसू! सारिका अचंबित होऊन पाहू लागली.

ङ्ग‘सारिका, ये बेटा. शाळेची वेळ ना ही तुझी? आज नाही जायचं?’’

‘‘अरे वा देवा, माझी आठवण ठेवतोस?’’ ती आनंदून गेली. मग हलकेच पुटपुटली, ‘‘मला नाही जावं वाटत शाळेत. तू आता देवच आहेस, तुला माहीतच असेल की सारे मला रंगावरून चिडवतात.’’

ङ्ग‘हो, त्यासाठीच मी वाटेवर तुझी वाट बघत बसलोय!’’

ङ्ग‘म्हणजे? तू मला त्या पूजासारखी गोरी करून देणार? माझा रंग बदलणार?’’

कन्हैय्या हसू लागला. ‘‘अगं वेडे, माझ्याकडे बघ, माझा रंग बघ. मी काळा आहे. सावळा नाही, का..ळा. बदलता आलं असता तर माझा मीच नसतो का गोरा झालो?’’ सारिकालाही हसू फुटले.

मी तुला हे सांगायला आलोय की रंगाचा आणि माणसाच्या हुशारीचा, यशाचा, आनंदाचा संबंध नाही. निसर्गाने काळे गोरे का निर्माण केले? त्वचेचा रंग काळा गोरा असतो म्हणजे काय? सांगतो. आपल्या त्वचेत मेलानिन नावाचे काळे रंगद्रव्य असते. विषुववृत्तीय


प्रदेशात ऊन अधिक, तेथे त्वचेत मेलानिन अधिक, तिथले लोक काळेसावळे. कारण उन्हात घातक असे काय असते?''

''अतिनील किरणे, जी शरीरात कर्करोग निर्माण करू शकतात,'' सारिकेला विज्ञानाचा धडा आठवला.

'अगदी बरोब्बर. त्यापासून बचाव व्हावा म्हणून निसर्गाने त्वचेला काळा कोट दिलेला आहे. पाश्चात्य देशात उन्हाचा अभाव, तिथल्या लोकांच्या त्वचेत मेलानिन कमी, त्यामुळे ते गोरे. इतके सोपे विज्ञान आहे.''

सारिकाच्या डोक्यात लख्ख उजेड पडला. आता हे शाळेतल्या ठोंब्यांना कसे समजवावे? त्यांना फक्त सौंदर्य दिसते.

''अभिनयासाठी गाजलेल्या अनेक अभिनेत्री सावळ्या होत्या. मार्टिन लुथर किंग, नेल्सन मंडेला, आपले बापू, एपीजे अब्दुल कलाम हे सावळे, काळेच होते की! जगातली सर्वात महाग मॉडेल नाओमी केम्बेल हीदेखील काळीच!'' देवच तो, त्याने सारिकेच्या मनातली शंका ओळखली.



''आजपासून सावळेपणाचा अभिमान बाळगायचा. कुणी सावळी म्हणून हाक मारली तर 'काय रे गोऱ्या' म्हणून उलट हाक द्यायची! अजिबात लाज नाही वाटून घ्यायची,'' कृष्णाने बासरी ओठावर धरली. मधुर स्वर निघू लागले. सारिका अनिमिष डोळ्यांनी देवाचे रूप साठवत असतानाच तिचा पाय निसटला आणि ती धपकन खाली पडली.

''अगं ऊठ बेटा, मला खूप कामं पडली आहेत,'' आई तिला खसाखस हलवत होती! सारिका तटकन उठून बसली. पटापट तयार होऊन आरशापुढे उभी राहिली. गोल चेहरा, दोन घट्ट वेण्या, लालचुटूक रिबिनी, पाणीदार डोळे, आणि सावळा सुंदर रंग! ती खुदकन मनाशी हसली.

(क्रमशः)

**संपर्क : ९४२२८७३३०३**

# आज काय झालं ?



कार्टुनिस्ट इरा
संपर्क: ९४२२३२५८३८

नमस्कार बालदोस्तांनो, या चित्रकथामालेत आपल्याला भेटायला येणार आहेत - कुहू - नील ही भावंडं. त्यांना आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींबद्दल प्रचंड कुतूहल आहे. त्यातूनच घडतात अनेक गमतीजमती. तर चला बघूया 'आज काय झालं ...'




बालदोस्तांनो, तुमच्याबाबतीत पण असं कधी घडलंय का? तुमची झालेली फजिती नक्की लिहून पाठवा :)

भाग १




## डॉ. संगीता बर्वे

'किशोर' मित्र-मैत्रिणींनो, बालभारतीच्या पाठ्यपुस्तकांमधील कविता आपल्याला आवडतात. आपण त्या पाठ करतो. त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहितो. त्या आपल्याला आवडतात. त्यांची आपल्याला गोडी लागते. या कविता आपल्याला नंतर आयुष्यभर आठवत राहतात. अशाच काही गाजलेल्या कवितांचा आस्वाद आपण इथे घेणार आहोत.

दरमहा एक कविता आणि त्या कवितेचा आशय साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, प्रसिद्ध कवयित्री **डॉ.संगीता बर्वे** 'बालभारतीच्या कविता' या सदरातून आपल्याला उलगडून दाखवणार आहेत. त्यातून तुम्हांला नक्कीच आनंद मिळेल असा विश्वास वाटतो.

# मराठीची थोरवी

कवी–संत ज्ञानेश्वर (ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी)
(१२७५–१२९६)



माझा मराठाचि बोलु कौतुके ।
परि अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके ।
मेळवीन ।।१।।
जिये कोवळिकेचेनि पाडे ।
दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधे परिमळाचे बीक मोडे ।
जयाचेनी ।।२।।
ऐका रसाळपणाचिया लोभा ।
की श्रवणींचि होती जिभा ।
बोले इंद्रिया लागे कळंभा ।
एकमेकां ।।३।।
सहजे शब्दु तरी विषो श्रवणाचा ।
परि रसना म्हणे रसु हा आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा ।
हा तोचि होईल ।।४।।
नवल बोलतीये रेखेची वाहणी ।
देखता डोळ्यांही पुरो लागे धणी ।
ते उघडली खाणी ।
रुपाची हे ।।५।।
जेथ संपूर्ण पद उभारे ।
तेथ मनचि धावे बाहिरे ।
बोलू भुजाही अविष्करे ।
आलिंगावया ।।६।।
ऐशीं इंद्रिये आपुलालिया भावी ।
झोंबती परि तो सरिसेपणेचि बुझावी ।
जैसा एकला जग चेववी ।
सहस्त्रकरु ।।७।।
तैसे शब्दांचे व्यापकपण ।
देखिजे असाधारण ।
पाहातया भावाज्ञां फावती गुण ।
चिंतामणीचे ।।८।।

मित्रमैत्रिणींनो, ज्ञानेश्वर हे तेराव्या शतकातील श्रेष्ठ संतकवी, म्हणजे या गोष्टीला आठशे वर्षे झाली. कल्पना करा, वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरांनी भगवद्‌गीता मराठीमध्ये आणली. मूळ भगवद्‌गीता आहे संस्कृतमध्ये! पण संस्कृत भाषेचे ज्ञान उच्चवर्गीय ब्राह्मणांपुरते मर्यादित होते. सामान्य लोकांना भगवद्‌गीता कशी समजणार? ज्ञानेश्वरांनी लोकांची अडचण जाणली आणि संस्कृत भाषेतील ज्ञान सहजसोप्या मराठी भाषेमध्ये आणले. या अमोल ग्रंथाला 'भावार्थदीपिका' म्हणतात. त्यालाच आपण 'ज्ञानेश्वरी' म्हणतो.

अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे मोहिनीराजाचे मंदिर आहे. ज्ञानेश्वर तेथील एका खांबाला टेकून बसत असत आणि समोर असलेल्या अथांग जनसमुदायाला भगवद्‌गीतेचा अर्थ रसाळ मराठीत समजावून सांगत असत. त्या खांबाला अजूनही 'ज्ञानोबाचा खांब' किंवा 'पैसाचा खांब' असे म्हणतात. डोळे मिटून कल्पना करून बघा, पैसाच्या खांबाला टेकून ज्ञानेश्वर मराठीची थोरवी वर्णन करून सांगत आहेत आणि आपण त्यांच्यासमोर बसून त्यांच्या तोंडून, या ओव्या ऐकत आहोत. कल्पनेने सुद्धा अंगावर रोमांच उभे राहतात, नाही!

मराठी भाषेची महती गाताना ज्ञानेश्वर म्हणतात,

माझ्या मराठीचे कौतुक तुम्हांला किती सांगू. मोठ्या कौतुकाने मी आपणास गीतेमधील तत्त्वज्ञान माझ्या मराठीतून सांगत आहे. मराठी भाषा अमृतासारखी गोड आहे. अमृतालाही जिंकून घेणारी रसाळ अक्षरे माझ्या भाषेमध्ये मी निर्माण करीन ।।१।।

हे शब्द इतके कोवळे आहेत की, गाण्यातले सात सूरदेखील त्यांच्यापुढे फिके पडतील. शिवाय ते इतके मन वेधून घेणारे असतील की फुलांचा सुवासदेखील त्यांच्यापुढे कमी पडेल ।।२।।

श्रोतेहो, हे शब्द इतके रसाळ आहेत, कानांनी नुसतेच ऐकण्यापेक्षा त्यांची चव पाहावी असे तुम्हांला वाटू लागल्यास नवल नाही. त्यांचा आस्वाद घेण्यासाठी तुमच्या कानांनाही जिभा फुटतील. या शब्दांचा आनंद लुटण्यासाठी कान, नाक, डोळे, जीभ आणि त्वचा ही शरीराची पाचही इंद्रिये आपापसांत भांडू लागतील ।।३।।

ती कशी? तर पुढीलप्रमाणे

खरे पाहता, शब्द आपण कानांनी ऐकतो, पण जीभ म्हणेल, शब्द रसासारखा आहे, चव घेण्यासारखा आहे म्हणून तो माझा विषय आहे. तर नाक म्हणेल, छे । शब्दांना सुवास आहे. हुंगून तर पहा किती सुगंधी आहेत हे शब्द । म्हणजे ते माझेच आहेत।।४।।

डोळे म्हणू लागतील, अरे! किती देखणे आहेत हे शब्द. यांचे रूप किती सुंदर आहे. ही रेखेची वाहणी म्हणजेच कवितेच्या या ओळी इतक्या नवलाईच्या आहेत, नयनरम्य आहेत की हे केवळ शब्दच नाहीत, तर रूपसौंदर्याची खाण आहे ही, या शब्दांकडे पाहताना डोळे तृप्त होऊन म्हणतील, शब्द तर फक्त माझेच।।५।।

जेव्हा संपूर्ण पद म्हणजे कविताच आपल्यासमोर उभी राहील, तेव्हा मनाला एवढा आनंद होईल की, ते स्वतः इतर सर्व इंद्रियांना बाजूला सारून बाहेर येईल आणि बाहू पसरून कवितेला आलिंगन देण्यासाठी उत्सुक होईल ।।६।।

अशा रीतीने, ही वेगवेगळी इंद्रिये आपापल्या स्वभावानुसार शब्दांचा आस्वाद घेण्यासाठी बेचैन होतील. ज्याप्रमाणे एकटा सूर्य, सर्व जगाला प्रकाश देतो तसा हा शब्द सर्व इंद्रियांची समभावाने समजूत काढून मराठी भाषेचे जग प्रकाशमान करील ।।७।।

शब्दांचे व्यापकपण असे असाधारण आहे, जे मनःपूर्वक शब्दांचा अर्थ जाणून घेतील; त्यांना चिंतामणी रत्न लाभल्याचा साक्षात्कार होईल. चिंतामणी म्हणजे आपण ज्या गोष्टीची इच्छा करू ती पूर्ण करणारा मणी. मराठी शब्दांची थोरवी इतकी अलौकिक आहे की त्यांचा अभ्यास करणाऱ्याला सर्व गोष्टींची प्राप्ती होईल; चिंतामणीचा प्रत्यय येईल ।।८।।

मुलांनो, 'मराठीची थोरवी', या कवितेमध्ये ज्ञानेश्वरांनी निरनिराळे दाखले दिले आहेत. मराठी भाषेचे महत्त्व किती असाधारण आहे हे त्यातून सांगितले आहे. ज्ञानेश्वरीची भाषा काव्यालंकारांनी नटलेली आहे. ही भाषा 'उ'कारमय आहे. बोलु, रसु, शब्दु असे उकारात्मक शब्द येथे आहेत. या उकारात्मक शब्दांमुळे भाषेला एक प्रकारचा गोडवा प्राप्त झाला आहे.


(क्रमशः)

**संपर्क : ९५४५९९५६९३**

## ✻ चला चित्र रंगवूया...!!!

२६ जानेवारीच्या परेडमध्ये मोटारसायकलवर स्वार झालेले हे जिगरबाज पहा. त्यांचा तोल राखला जाईल असे चित्र पूर्ण करा आणि छानसे रंगवा.

रेश्मा बर्वे



**मराठी अभिजात भाषा झाली, आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवत आहे. पुढील विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

# जादूचा खजिना आनंदाचे पंख देणारा

प्रवीण दवणे

**किशोर मित्रमैत्रिणींनो, बुद्धीचा विकास महत्त्वाचा आहेच, त्या सोबत आनंदाने जगण्यासाठी कल्पनेच्या पंखांवर जादूच्या खजिन्याकडे नेणारा भाषेचा नंदादीप जपणे हेही आपले कर्तव्य. ज्यांचे नाव काळाच्या ओघात वाहून गेले, मात्र ते कवी काव्यगोष्टींचा खजिना मात्र ठेवून गेले. काय त्यातली गंमत? चला तर, तीच आज वेचू**

ह्या वेळी आपल्या बालदोस्तांसाठी मराठी भाषेने जपलेला मजेशीर खजिना उघडला जाणार आहे. खूप मजेशीर! आणि ह्या भाषेच्या खजिन्याची, गंमत ही आहे की, आपल्याला पिढ्यान् पिढ्या आनंद देणाऱ्या खजिन्याचा धनी कोण आहे, ह्या अनमोल हिरे माणकांच्या दागिन्यांचा खजिनदार कोण, त्याचे नाव मात्र आज कुणालाच माहीत नाही.

म्हणजे बघा, अपार आनंदाचे अंगण खुले करणारी, लय आणि ताल यांचे नुपूर बांधून मनाला भुरळ पडणारी; म्हटले तर ही साधी सोपी बडबड गीते आहेत, पण त्यातून कल्पनेच्या पंखावर ती वेगळ्याच प्रदेशात घेऊन जातात.

सगळ्यांनाच माहीत असलेली कावळा आणि चिमणीची ती एक मजेशीर कथा. त्यात कवितेची लय आहे, संवाद आहे, आणि मजेशीर नाट्यसुद्धा आहे. एका साध्या सोप्या कवितेने वर्षानुवर्षे सर्वांच्या बालपणाला लय आणि ताल आपोआपच दिला आहे. पण ह्या गोष्टगीताचा निर्माता कोण ते मात्र कुणालाच ठाऊक नाही. त्यात कावळ्याचे घर होते शेणाचे! चिमणीचे घर होते मेणाचे! अशी सुरुवातच यमक साधत येते. म्हणजे शेणाचे नंतर मेणाचे येताना मन आपोआप ताल धरते आणि चिमणीला नि कावळ्याला घर देऊन ते माणसात आणते. नेहमी हीत घरासमोरील झाडावर भिरभिरणारे हे पक्षी अगदी आपल्या जवळचे होतात. आपण त्यांच्या घरात अगदी सहजगत्या जातो, एक कविता ही गंमत घडवून आणते. पुढची कविता सर्वांनाच माहीत आहे, ती सांगत आपण वेळ घालवणार नाही आहोत, पण पुढे ह्या गोष्टीकाव्यात संवाद येतात, तेही अगदी बोली भाषेत. नि मनाला धक्का देणारी अनपेक्षित घटना केवळ दोन ओळींत हा आज ज्ञात नसलेला कवी मांडून जातो. अचानक पाऊस येता, तोही धो धो! कावळ्याचे घर



वाहून जाणारे, आणि चिमणीचे घर मात्र मेणामुळे टिकून राहणारे, एक उत्सुकता वाढवणारी गंमत घडते. गोष्टी कवितेतले पशुपक्षी अगदी आपल्यासारखेच बोलतात. तुमच्यासाठी बालकथा आणि कविता लिहिणारे हे नेहमी पशुपक्ष्यांनाही आपल्या जगात आणतात आणि गंमत घडवतात. ह्या कवितेत संवाद तर आहेच, पण चिऊताई रूपाने आपली आई स्वतःच्या चिमण्या बाळासाठी, नि काऊपासून त्या पिल्लाला दूर ठेवण्यासाठी काय काय युक्त्या करते त्याचे, आजही सर्वांना चकित करणारे दर्शन घडते. ती दार उघडत नाही, नि आपण कुठल्या कामात गुंतलो आहोत, हे सांगत बाळाचे नि आईचे प्रेमळ नाते मनाला आनंद देते. ती चिऊताई बाळाला अंघोळ घालते, तीट पावडर लावते, कपडे घालते. क्रमाक्रमाने ही गोष्टकविता पुढे जाते. आजही तुमच्यातला एखादा छोटा कवी ही कविता पुढे ठेवून आजच्या काळात आजची चिमणी आणि आजचा काऊ कसा बरं संवाद करेल? काय नवे आज घडेल? यावर एक कविता करू शकतो. प्रयत्न करायला काय हरकत आहे, खूप मजा येईल. प्रयत्न तर करा, नि शाळेतल्या गुरुजींना, बाईंना जरूर दाखवा.

बहुदा त्याच कवीने 'चांदोमामा-चांदोमामा' भागलास का? ही कविता लिहिली असावी. कारण लिहिण्याची पद्धत, संवाद, अनपेक्षित घटना, त्यातील गंमत अगदी तशीच आहे. आपल्या मराठी भाषेमध्ये कायमच्या रुजलेल्या ह्या कवितेचा कवीसुद्धा अज्ञात आहे. म्हणजेच कवीचे नाव माहीत नाही. कविता आपल्यासाठी ठेवून गेला, नाव मात्र बरोबर नेले.

आता बघा ना, सर्वांनाच माहीत असलेल्या चांदोमामाच्या कवितेत, रोज आपण जो चांदोबा पाहतो, त्याला 'मामा' केला. तुम्हांला माहीत आहे का? भाऊबीजेला जर दुरून येणारा भाऊराया ओवाळणीसाठी घरी येऊ शकत नसेल तर त्याची बहीण चंद्राला ओवाळत असे. म्हणूनच हा आकाशातला चंद्र आपल्या सगळ्यांचा 'चांदोमामा' झाला. निसर्गाशी नाते किती सहज जोडतो हा अज्ञात कवी! लपलेल्या चांदोबाला त्या कवितेतला बालक म्हणतो. 'अरे लिंबोणीच्या करवंदी जाळीदार झाडामागे लपण्यापेक्षा, माझ्या मामाचा वाड्यात ये ना! कसा आहे मामाचा वाडा?' एका छोट्या ओळीत मामाचा वाडा आपल्याला दिसू लागतो. ज्याचे नाव माहीत नाही अशा कवीची प्रतिभा इथेच आपल्याला जाणवते. वाडा कसा? तर मामाचा वाडा चिरेबंदी. हा वाडा करवंदी नाही, वाऱ्याने हलणारा नाही. तर तो मजबूत, उंच चिरेबंदी आहे. त्या मामाचा वाड्यात एकदा तरी ये रे! नुसतेच वाड्यात येण्याचे निमंत्रण नाही बरं का! मामाच्या घरची तूप आणि रोटी तू खाऊन जा. पण ह्या कवितेत एक वेगळीच गंमत घडते. हे सगळे कल्पनेतच घडते. तुपात माशी पडते, बिचारा चांदोमामा उपाशी राहतो. केवळ आठ नऊ ओळींच्या गोष्टकवितेत कितीतरी तत्कालीन जीवनाचे दर्शन घडवले आहे. या अज्ञात कवीने निसर्ग आणि आपले घरगुती नाते जोडले आहे.

अशा कितीतरी कविता, कहाण्यांमधून मराठी भाषेची सुंदरता जपली आहे. आपले प्रिय शिक्षक नि आईबाबा भाषेचा हा अनमोल आनंद तुम्हांला देतात. इतर भाषा जागतिक ज्ञानविज्ञानासाठी शिकताना, आपल्या पूर्वजांनी दिलेल्या या खजिन्याकडे दुर्लक्ष होऊन कसे बरे चालेल?

किशोर मित्र-मैत्रिणींनो, तुमचा एक जवळचा मित्र म्हणून मी सांगेन, विविध प्रकारचे वाचन आणि वाचनातून मिळणारा आनंद यात तुमचे मन आणि पुढील आयुष्य समृद्ध करणारा आनंद आहे. हे सत्य किशोरवयातच कळू द्या. पुढे मोठे झाल्यावर, अरे हे वाचले असते तर..! आपल्या भाषेचा आनंद तेव्हाच घेतला असता तर .. अशी चुटपुट लागून उपयोग नाही. कारण हे गोजिरवाणे बालपण आयुष्यात पुन्हा कधी मिळत नाही.

जे पुन्हा कधीही मिळत नाही, ते तुम्हांला आज या क्षणी लाभले आहे; म्हणूनच ह्या खजिन्याचे दालन उघडले आहे. या दोन सर्व परिचित कवितांच्या निमित्ताने, पूर्वजांनी आपले नाव मागे न ठेवता, आपल्याला भाषेचा कुठला खाऊ ठेवला आहे हे सांगण्याचा हा प्रयत्न केला. अशा अनेक कवितांतून दडलेल्या अनेक गमती आपण पुढेही बघणार आहोत. तुम्ही मनापासून वाचत आहात, हे मला तुमच्या प्रतिक्रियांमधून कळते. म्हणूनच 'वेचू आनंदे' ही गप्पांची फुलबाग फुलत जाते.

(क्रमशः)

**संपर्क : ९८२०३८९४१४**

# टिंबाची भाषा...

डॉ. निलिमा गुंडी




शाळेतून आल्या आल्या केदारने नेहमीप्रमाणे आईला प्रश्न विचारायला सुरुवात केली.

''आई, परीक्षेत गाळलेल्या जागा भरा' असा प्रश्न असतो ना? तो प्रश्न मला आवडतो. त्यात मला पैकीच्या पैकी मार्क मिळतात. समजा, असं विचारलं– 'भारताला........रोजी स्वातंत्र्य मिळाले. तर '१५ ऑगस्ट १९४७' हे उत्तर मला माहीत असतं. पण इतिहासाच्या परीक्षेत जसे मला सगळे मार्क मिळतात. तसे मराठीत मिळत नाहीत. मला तू मराठीतल्या गाळलेल्या जागांचे प्रश्न शिकवशील?''

केदारला शिकण्याची जिज्ञासा आहे, याचाच आईला आनंद झाला. ती म्हणाली, ''केदार, तू 'गाळलेल्या जागा' म्हणतोस; त्याला आपण 'टिंबांची भाषा' असं नाव देऊ या! हे बघ, मराठी भाषा शिकताना टिंबांची भाषा मनाने ओळखून लिहिणे; हा खरं तर एक खेळ आहे. असं समज, त्यात कठीण काही नाही.''

''अरे वा! आई, तू असं हसत खेळत शिकवतेस ना; ते मला फार आवडतं!'' केदार खूष होऊन म्हणाला.

''हे बघ केदार, तुला मी एकदा एक गोष्ट सांगितली होती. त्यात एक लहान मुलगी आजोळी गेल्यावर पत्रातून आपल्या घरातल्या छोट्या वासराला स.न.वि.वि. लिहिते. आठवतं का? त्यात 'स.न.वि.वि.' म्हणजे सप्रेम नमस्कार विनंती विशेष




# अर्थाचा पत्ता सापडला

यासाठी आलेले संक्षिप्त रूप आहे. ती एक प्रकारे टिंबांची भाषा आहे. प्रत्येक शब्दाचे पहिले अक्षर त्यात संक्षेप करण्यासाठी घेतले आहे आणि पुढे पूर्णविरामाचे चिन्ह–टिंब–दिले आहे. हो की नाही?'' आईचे हे उदाहरण केदारला एकदम पटले. तो म्हणाला, ''खरंच गं! पत्रात आपण खूप ठिकाणी अशी टिंबांची भाषा वापरतो की! शि.सा.न.वि.वि.असंही लिहितो. काय गं त्याचा अर्थ?''

''छान! शि.सा.न.वि.वि.म्हणजे 'शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष!' याचा अर्थही नीट ऐक. वडीलधाऱ्या व्यक्ती म्हणजे आजी–आजोबा अशांसाठी हा संक्षिप्त शब्द लिहिला जातो. याचा अर्थ दंडवत घालणे. डोक्यासह आठ अंगे म्हणजे अवयव जमिनीवर टेकवून खूप विनम्र भावनेने नमस्कार करणे. आता टिंबाची भाषा आणखी कोठे येते; ते मी सांगते. काल तू मन्याबरोबर घरी येताना रस्त्यावरून धावत होतास. तेव्हा ते पाहून तुझी आजी म्हणाली. ''काय पण बाई याची घाई...नुसता धावत सुटतो...एखाद्या दिवशी....नको गं बाई! तोंडातून शब्दसुद्धा फुटत नाही!'' आता यात आजीने तिला वाटणारी भीती शब्दांतून सांगितली नाही. तू पडशील, तुझा अपघात होईल...अशा नाना शंका तिच्या मनात आल्या असणार! पण वाईट विचार मनातसुद्धा आणू नये. म्हणून तिने वाक्य अर्धवट सोडले. म्हणजेच तिथे टिंबांची भाषा वापरता आली. याला 'लोपचिन्ह' असंही म्हणतात. कळलं?''

''अगदी छान कळलं! मला एकदा आजोबा रागावून म्हणाले होते. ''तुझा इतका राग आला आहे! पण जाऊ दे...'' आणि पुढे काहीच बोलले नाहीत. तिथेही हीच टिंबं असणार. पण त्यांच्या मनात काय असेल, ते मला थोडं थोडं कळलं हं! त्यांनी राग गिळला होता. त्या टिंबांच्या खुणांमधून मला ते कळलं!'' केदार पटकन म्हणाला.

''शाब्बास!'' आई हसून म्हणाली, ''अरे, स्वतःच्या मनावर ताबा ठेवण्यासाठी कधी टिंब, टिंब वापरतात; कधी तुमच्या कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठीही ही भाषा वापरतात. आता कळलं का?''

''हो! मी आता एका वहीत संक्षेपासाठी येणारी टिंबांची भाषेतली शब्दांची संपूर्ण रूपं लिहून काढतो आणि तू इतकी छान शिकवतेस गं! आता काय बोलू मी...'' असं म्हणून मिश्किलपणे हसत तो थांबला.

माझं कौतुक नको. मी उद्या तुला काही शब्द आणि वाक्ये घालणार आहे. त्यातली टिंबांची भाषा तुला वाचता येते की नाही, त्याची परीक्षा घेणार आहे. त्यासाठी जरा डोक्यात असे शब्द आठव. म्हणजे मीच तुझं कौतुक करीन. किती आणि कसं करीन ते काय सांगावं...'' आई एवढं म्हणून हसली.

(क्रमशः)

**संपर्क : ९८८१०९१९३५**

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर

संपर्क : ९९२२५२२६६८



## बैल गेला नि झोपा केला


बैलासाठी एखादी चांगली झोपडी (झोपा) बांधू असे म्हणत ते काम करण्यासाठी भरपूर वेळ दवडला, दरम्यान हिवाळा आला आणि चांगला निवारा नसल्यामुळे तो बैल मरूनही गेला. त्याच्यानंतर मग झोपडी बांधून काय उपयोग? एखादे काम वेळच्या वेळी झाले नाही, महत्त्वाचा वेळ दवडला आणि त्यानंतर ते काम केले तर त्या कामाचा काही उपयोग होत नाही.

## गंगाजळी



गंगाजळी या शब्दाचा मूळ अर्थ 'गंगेचे साठवण ठेवलेले पाणी' असा आहे. हिंदू धर्मामध्ये माणसाच्या मरण जवळ आल्याच्या घटकेला गंगेचे पाणी पाजतात. त्यासाठी कोणी तीर्थयात्रेच्या निमित्ताने काशीला गेल्यास येतेवेळी मुद्दाम गंगाजळ घेऊन येतात आणि ते जपून ठेवतात. त्यांचा वापर केवळ मरण घटकेलाच करावयाचा असतो. तोपर्यंत त्याला राखून ठेवायचे असते.


गंगाजळी हा शब्द बँकिंग किंवा सहकार क्षेत्रात विशिष्ट अर्थाने वापरला जातो. इथे गंगाजळी म्हणजे बाजूला काढून, राखून ठेवलेले धन. गंगाजळीचा उपयोग अपरिहार्य असेल तेव्हाच करावयाचा असतो. ज्या धनाला सारखा हात लावायचा नसतो ते धन म्हणजे गंगाजळी.



## अनागोंदी

आनेगुंडी नावाचे तुंगभद्रा नदीच्या तीरावर असलेले गाव, पूर्वी विजयनगरच्या राज्याच्या राजधानीचे ठिकाण होते. अनेगुंडी या कानडी शब्दाचा अर्थ हत्तीचे फिरण्याचे ठिकाण असा आहे. विजयानगरच्या मोठ्या राज्याचे छोटे छोटे घटक हिशेबात हेराफेरी करत त्यावरून अर्थ संकोच होत आनेगुंडी या शब्दाचा अर्थ भपकेदार, अव्यवस्थित, ताळतंत्र नसलेला असा उत्तरोत्तर होत गेला. आता अनागोंदी हे मराठीतले विशेषण कारभार, व्यवस्था, जमाखर्च इत्यादी नामांच्या पूर्वी लावण्यात येते.

## तुंबडी



पूर्वीच्या काळी शरीरातील दूषित रक्त किंवा वायू बाहेर काढण्यासाठी तार असलेले भोपळ्याचे एक साधन वापरले जाई. त्याचे स्वरूप नळीसारखे (तोंडाला) असे. यालाच 'यंत्र' असेही म्हटले जाई. अशा या साधनाला 'तुंबडी' असे संबोधले जात होते. भोपळ्याला नळी जोडलेले साधन (यंत्र). या शब्दाला भोपळ्याचे तंतुवाद्य आणि भिक्षापात्र असेही अर्थ आहेत. यावरूनच 'तुंबडी भरणे' म्हणजे आपल्या पदरात हवे तितके पाडून घेणे. 'तुंबडी लावणे' म्हणजे 'शोषण करणे' असे अर्थ व्यवहारात रूढ झाले.

# प्रश्नमंजुषा

डॉ. सुधीर मोरे

१) **जैसी दीपांमाजी दिवटी।**
**का तिथींमाजी पूर्णिमा गोमटी ।।**
**तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी। सर्वोत्तम ।।**
**असे मराठीचे महात्म्य कोणी विशद केले आहे?**

अ) संत ज्ञानेश्वर आ)फादर फ्रान्सिस दिब्रिटो
इ) कवी गोविंदाग्रज ई) केशवसुत

२) **'लीळाचरित्र' या ग्रंथातील लीळांचे (आठवणी) संकलन कोणी केले?**

अ) मुकुंदराज आ) राजा सातवाहन
इ) चक्रधरस्वामी ई) म्हाइंभट्ट

३) **'वाचन प्रेरणा दिन' कोणाच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो?**

अ) डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम
आ) वि.वा. शिरवाडकर
इ) वि.स.खांडेकर
ई) भालचंद्र नेमाडे

४) **२०२५ सालचा 'साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार' खालीलपैकी कोणत्या लेखकाला मिळाला आहे?**

अ) भारत सासणे आ) संजय वाघ
इ) सुरेश सावंत ई) राजीव तांबे

५) **'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्राचे अधिकृत राज्यगीत कोणी लिहिले आहे?**

अ) राजा बढे आ) कुसुमाग्रज
इ) गोविंदाग्रज ई) माधव ज्युलियन

६) **'केशवकुमार' हे टोपण नाव कोणाचे आहे?**

अ) कृष्णाजी केशव दामले
आ) त्र्यंबक बापूजी ठोंबरे
इ) प्रल्हाद केशव अत्रे
ई) राम गणेश गडकरी

७) **'मातृहृदयाचा महाकवी' असे उद्गार कोणत्या लेखकाबद्दल काढले गेले आहेत?**

अ) यशवंत आ) मंगेश पाडगावकर
इ) साने गुरुजी ई) विंदा करंदीकर

८) **लेखनदृष्ट्या योग्य शब्द ओळखा.**

अ)अंधकार आ) अंध:कार
इ) अंधक्कार ई) आंधक्कार

९) **दिल्ली येथे संपन्न झालेल्या '९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' अध्यक्ष कोण?**

अ) डॉ. रवींद्र शोभणे आ) डॉ. तारा भवाळकर
इ) डॉ. सरोजनी वैद्य ई) डॉ. सदानंद मोरे

१०) **'बरी खुशामत शाहण्याची, परि मूर्खाची ती मैत्री नको। कष्टाची बरी भाजीभाकरी, तूपसाखरे चोरू नको।' हा सुभाषितवजा फटका कोणी लिहिला आहे?**

अ)शाहीर अनंत फंदी आ) शाहीर परशराम
इ)शाहीर राम जोशी ई) शाहीर होनाजी बाळ

**संपर्क : ९४२२०००६११**


## प्रश्नमंजुषा डिसेंबर २०२५ ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ – ४ | २ – १ | ३ – २ | ४ – ३ | ५ – ३ |
| ६ – ४ | ७ – २ | ८ – १ | ९ – ४ | १० – १ |

# कापसाची लेक

**डॉ. कैलास दौंड**

दिवाळी संपली. रानात कपाशीची बोंड उलारली होती. यंदा पाऊस बरा झाल्याने पानेदेखील हिरवीगार होती. डोक्यावर चटकणारं ऊन वाढत होतं. कुढं मुढं कापूस वेचणीला सुरुवात झाली होती. कमरेला मिळेल त्या धुडक्याची ओटी बांधून हिरव्या रानातील पांढरा कापूस वेचणाऱ्या बाया अगदी कपाशीच्या बियाण्याच्या पिशवीवरील चित्रासारख्या दिसत होत्या. अंगावर पडणारं उन, लागणारी तहान आणि बोटांच्या शेंड्याला टोचणाऱ्या कपाशीच्या नकट्या, हातावर ओरबडणारे काड्यांचे ओरखडे मात्र कुणाचंही लक्ष वेधून घेत नव्हते. कारण हे काम चपाटीनं करायचं काम होतं. आपापल्या रानातील कापूस



वेचण्याचं काम जो तो जमवत होता आणि रोजंदारीनं कापूस वेचायला जायचं म्हटलं तरी आठ रुपये किलोचा भाव असायचा. गावातील बरेच जण शनिवार-रविवार कडे डोळे लावून बसलेले होते. कारण शनिवारी दुपारी आणि रविवारी शाळेला असणारी सुट्टी. या दिवशी बऱ्याच घरची शाळकरी मुलं कापूस वेचायला जायची; तर काही घरचाच कापूस वेचायची. त्यातही काही बऱ्या घरची मुलं सुट्टीतही कापूस वेचायला जात नसत. काही आईबाप स्वतः रोज कष्ट करत असूनही आपल्या लेकरांनी चांगला अभ्यास करावा, चांगले शिक्षण घ्यावे आणि पुढे चांगले जीवन त्यांच्या वाट्याला यावे या इच्छेपोटी लेकरांना सुट्टीतही कापूस वेचायला नेत नव्हते. अशाच पालकांपैकी होते सुभद्राबाई आणि तुकाराम.

सुभद्राबाई आणि तुकाराम यांना दोन एकर कोरडवाहू शेती होती. त्यात ते एखाद्या वर्षी बाजरी, ज्वारी तर एखाद्या वर्षी कपाशीचे पीक घेत असत. यंदाही शेतात कपाशीचे पीक होते. ते वेचणीलाही आलं होतं. त्यांची कामाची लगबग चाललेली होती. ती लगबग बघून त्यांच्या सीमा आणि रामा या शाळकरी मुलांना वाटे की, आपणही एखाद्या रविवारी शेतात जाऊन आई-वडलांना मदत करावी. पण त्यांनी तसे विचारले की आईवडील म्हणत ''बाळांनो, तुमचा शाळेतील अभ्यास करा. काम करायला आम्ही आहोत ना!'' त्याचे कारणही तसेच होते.कारण ते दोघेही शाळेत खूप हुशार होते. सीमाचा तिसरीत आणि रामाचा चौथीत पहिलाच नंबर होता.

जानेवारीची पाच तारीख होती. शाळेत सरांनी सहलीची सूचना सांगितली. सहल कोकणात जाणार होती. सहलीत समुद्रकिनारा, जलदुर्ग आणि आणखी काही ठिकाणे पाहावयास मिळणार होती. सहलीसाठी प्रत्येकी चारशे रुपये फी ठेवलेली होती. सीमा आणि रामाला वाटले आपल्याला घरून सहलीला पाठवतात की नाही कुणास ठाऊक? पण आईवडलांना सांगून तर पाहू. म्हणून त्यांनी संध्याकाळी आईवडील घरी आल्यावर सांगायचे ठरवले.

शाळेतून घरी आल्यावर सीमा आणि रामा आईवडील शेतातून घरी येण्याची वाट पाहत होते. थोड्याच वेळात ते शेतातून घरी परतले. हातपाय धुवून झाल्यावर आईने चहा केला. सीमाने तो वडलांना दिला. आईने स्वतःला बशीत ओतून घेतला. मग रामा म्हणाला, ''दादा, आमची सहल कोकणात जाणार आहे यंदा.'' वडलांना ते दादा म्हणत.

''चारशे रुपये वर्गणी ठेवलीय प्रत्येकाला.'' सीमा म्हणाली.

''आता या पोरांना सहलीला जायचे असेल. हजारेक रूपये तरी लागतील दोघांना.'' आई वडलांना ऐकू जाईलसे म्हणाली. ''बरं.. ते कपड्यांसाठी ठेवलेल्या पैशातील पैसे देऊ त्यांना!'' वडील म्हणाले.

वडलांनी स्वतःच्या कपड्यांसाठी ठेवलेले पैसे मुलांच्या सहलीसाठी द्यायचे ठरवले. पैसे मिळणार म्हणून सीमा व रामा आनंदले. दुसऱ्या दिवशी वडलांनी शाळेत येऊन शिक्षकांना पैसे दिले आणि सहलीची माहिती घेतली. ठरल्याप्रमाणे सहल गेली. मुलांना वेगवेगळी ठिकाणे पहायला मिळाली. त्यांना खूप मजा आली. सीमाने आईसाठी एक छोटी पर्स विकत घेतली होती तर रामाने वडलांसाठी उन्हापासून संरक्षण म्हणून छानदार टोपी विकत घेतली. घरी आल्यावर त्यांनी आणलेल्या वस्तू पाहून आईवडलांना आनंद झाला.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाताना रामा सीमाला म्हणाला ''दिदी, आपल्याला दादांनी व आईने त्यांच्या कपड्यांसाठी ठेवलेले पैसे दिले आहेत.आता त्यांना लवकर कपडे घेता येणार नाहीत. कापूस विकल्याशिवाय ते कपडे घेणार नाहीत.''

''हो रे भाऊ. आता आपण काय करायचे?'' सीमा म्हणाली.

मग थोड्या वेळ दोघेही शांतपणे शाळेचा रस्ता चालू लागले. शाळेतही त्यांच्या मनात तोच विचार चालू होता. शाळा सुटल्यावर सीमाने रामाला गाठले. ''भाऊ, आपण कापूस वेचायला जाऊ या का रे?'' सीमाने विचारले.

''का बरे?'' रामाने विचारले.

''अरे आपण कापूस वेचून पैसे जमवू व त्याचे दादाला व आईला कपडे घेऊ.'' सीमा म्हणाली.

यावर दोघांनी काही चर्चा केली. नंतरच्या शनिवारी दुपारी ते घरी अभ्यास करत होते. तेव्हा त्यांच्या घरामागील शेतात शेतकरी कापूस वेचत होता. दोघेही तेथे गेले. ''कापूस वेचायला किती रुपये किलो आहे?'' रामाने विचारले.

''दहा रुपये, येता का वेचायला.'' शेतकरी म्हणाला.

मग ठरले. मग शनिवारी दोघांनी मिळून एकवीस किलो आणि रविवारी तीस किलो कापूस वेचला. अशा प्रकारे त्यांनी, पाचशे दहा रुपये मिळवले आणि आईवडील शेतातून घरी यायच्या अगोदर घरी येऊन झाडलोट करून अभ्यास करत बसले. त्यानंतरच्या शनिवारी आणि रविवारी देखील त्यांनी तसेच केले.

मग एके दिवशी सायंकाळी आईवडील शेतातून घरी आल्यावर आणि चहा वगैरे घेऊन झाल्यावर त्यांनी सीमा व रामाच्या अभ्यासाची चौकशी केली. तो उत्तम होता. मग सीमा म्हणाली, ''दादा, आम्ही तुम्हांला एक भेट देणार आहोत.''

''ती काय बा?'' दादा म्हणाले. या वेळी आई आपल्या लेकरांकडे कौतुकाने पाहू लागली. सीमाने रामाला खुणावले, तसा रामा मांडणीकडे गेला आणि मांडणीतील एक डबा खाली घेऊन उघडला. त्यातून एक कागदाची पुडी त्याने बाहेर काढली व सीमाकडे दिली. सीमाने ती उलगडून त्यातून पैसे काढले व दादांच्या हातावर ठेवले.

''कुणी दिले हे पैसे?'' वडलांनी आश्चर्याने विचारले.

''दादा आणि आई, तुम्ही तुमच्या कपड्यांसाठी ठेवलेले पैसे आमच्या सहलीसाठी भरले. त्यामुळे आमची सहल मजेत झाली पण तुम्ही कपडे कधी घेणार?'' सीमाने बोलताना रामाकडे पाहीले.

''आम्ही मागच्या आणि या आठवड्यात अभ्यास पूर्ण करून झाल्यावर काही वेळ शेजारच्या काकांच्या शेतात कापूस वेचून हे पैसे जमवले आहेत. तुम्हांला कपडे घेण्यासाठी.'' रामाने सांगितले.

''अरे, पण काही गरज होती का हे करायची?'' बाबा म्हणाले.

आईच्याही डोळ्यांत पाणी तरळले.

''ही कल्पना सीमा दिदीची होती.'' रामा म्हणाला.

''हो, ही पोर खरीखुरी कापसाची पोर!मऊ मऊ मायेची.'' बाबा म्हणाले नि आईने सीमाला आपल्या जवळ ओढून पोटाशी घट्ट पकडले. ''खूप अभ्यास करा बाळांनो!'' आई म्हणाली.

**संपर्क** : ९८५०६०८६११

# दे आम्हांला नववर्षा

विलास मोरे

विज्ञानाचा प्रकाश दे
विचारांचे आकाश दे
अज्ञानाचा विनाश दे
दे आम्हांला नववर्षा

धरणीचे मातृत्व दे
आभाळाचे दातृत्व दे
काळाचे तू नेतृत्व दे
दे आम्हांला नववर्षा

सागराचे उधान दे
उरामध्ये तुफान दे
माणुसकीचे भान दे
दे आम्हांला नववर्षा

विजेचा तो लोळ दे
ढगांचाही कल्लोळ दे
शब्दांना या तू अर्थ दे
दे आम्हांला नववर्षा

प्रेमाचा तू मंत्र दे
एकात्मतेचे तंत्र दे
प्रगतीचे तू यंत्र दे
दे आम्हांला नववर्षा

संपर्क : ७५८८००७८६६



# ‘बालभारती’ची
## इतर लोकप्रिय प्रकाशने




छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणादायी व आदर्श कार्याचा प्रसिद्ध व दिग्गज इतिहासकार, विचारवंत यांनी आपल्या लेखांच्या माध्यमातून घेतलेला वेध.
पृष्ठ संख्या : १४०
किंमत २५८ रुपये फक्त

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी योगदान देणाऱ्या देशभक्त व्यक्तिमत्त्वांच्या कार्यांचा इतिहास यामध्ये मांडण्यात आला आहे.
पृष्ठ संख्या : ८१
किंमत ११० रुपये फक्त








प्रसिद्ध संपादक, लेखक कुमार केतकर लिखित भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महाराष्ट्राच्या योगदानाची माहिती देणारा अभ्यासपूर्ण ग्रंथ.
पृष्ठ संख्या : ३४५
किंमत २४२ रुपये फक्त

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व लेखक ग.प्र.प्रधान लिखित भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या गौरवशाली इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनांचा मागोवा.
पृष्ठ संख्या : ८०
किंमत ११० रुपये फक्त




छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याचा अभ्यासपूर्ण वेध घेणारा स्मृतिग्रंथ
पृष्ठ संख्या : २३६
किंमत ३६० रुपये फक्त




विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार करणाऱ्या विविध प्रसिद्ध लेखकांच्या सर्वोत्तम कथांचा संग्रह. मुलांमध्ये वाचनाची गोडी आणि मूल्यशिक्षण रुजवणारे पुस्तक इयत्ता २री ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी भाग १ ते ३ उपलब्ध

इयत्ता पहिली ते चौथीच्या इंग्रजी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील सर्व शब्दांचा समावेश असलेला व विषय तज्ज्ञांच्या सहाय्याने निर्माण करण्यात आलेला उपयुक्त शब्दकोष
पृष्ठ संख्या : १००
किंमत २८ रुपये फक्त







विविध गंभीर प्रसंगी स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत अचूक व शास्त्रशुद्ध माहिती देणारी आणि संरक्षण विषयाच्या तज्ज्ञांमार्फत तयार करून घेण्यात आलेली प्रशिक्षण पुस्तिका.
पृष्ठ संख्या : ४६
किंमत २५ रुपये फक्त

ऐतिहासिक बोधपर कथामाला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासासंबंधीच्या वाचनीय कथा भाग १ ते ५ उपलब्ध
पृष्ठ संख्या : ११२
किंमत १८८ रुपये फक्त







शालेय नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र आणि प्रशासन कोश एकूण ५७२ संकल्पना व संज्ञा यांचा थोडक्यात परिचय, स्पर्धा परीक्षार्थी, विद्यार्थी, शिक्षक व पालकांसाठी उपयुक्त संदर्भग्रंथ
पृष्ठ संख्या : २७२
किंमत ३५५ रुपये फक्त

**वरील पुस्तकांच्या खरेदीवर ३०% सवलत**

**वरील पुस्तकांच्या खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा.**

विभागीय भांडारे: पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

आशिष वरघणे

# कुडकुड थंडी भरली रे

शाळेला सुट्‌टी पडली रे
कुडकुड थंडी भरली रे
    गव्हाचे दांडे ओले निळे
    सकाळी ऊन सोनपिवळे
    बगळे पाण्यात हसती रे
    कुडकुड थंडी भरली रे
बोरीला बोरं बारा तेरा
तुरीशेंगांत भरला वारा
खिशात मेवा भरती रे
कुडकुड थंडी भरली रे
    सागाची पानं खरबुडी
    चण्याच्या रानात कुरघोडी
    वानरे खात बसली रे
    कुडकुड थंडी भरली रे
सांज लेऊन मोत्यांचा तुरा
आभाळी पांगला चांदणचुरा
डोळ्यांत सुट्‌टी संपली रे
कुडकुड थंडी भरली रे.

संपर्क : ९३५९६७९०९३



योगेश दराडे

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' डिसेंबर २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ जानेवारी २०२६ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

# कुतूहल

संपर्क : ९९२३७४०३७४

**१) प्रजासत्ताक दिनाला राष्ट्रध्वज कोण फडकवते?**
१) राष्ट्रपती २) पंतप्रधान
३) अर्थमंत्री ४) मुख्यमंत्री

**२) 'आंतरराष्ट्रीय शिक्षण दिवस' कधी साजरा केला जातो?**
१) २८ जानेवारी २) १६ जानेवारी
३) १० जानेवारी ४) २४ जानेवारी

**३) २५ जानेवारी 'राष्ट्रीय मतदार दिवस' कधीपासून साजरा केला जातो?**
१) २०१२ २) २०१४
३) २०१३ ४) २०११

**४) भारतीय राज्यघटनेत शिक्षणाचा अधिकार कोणत्या कलमात दिलेला आहे?**
१) कलम ४२ २) कलम २१(अ)
३) कलम ३२ ४) कलम ४५

**५) ययाती, नटसम्राट, देवयानी, वीज म्हणे धरतीला इत्यादी नाटके कोणत्या लेखकाने लिहिली आहेत?**
१) विष्णू वामन शिरवाडकर
२) पु. ल. देशपांडे
३) वि. स. खांडेकर
४) प्र. के. अत्रे

**६) मकर संक्रांतीच्या दिवसानंतर सूर्य कोणत्या दिशेला सरकतो?**
१) उत्तर २) दक्षिण
३) पूर्व ४) पश्चिम

**७) २०२५ मध्ये पार पडलेल्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाची कर्णधार कोण होती?**
१) मिताली राज २) हरमनप्रीत कौर
३) स्मृती मानधना ४) झुलन गोस्वामी

**८) 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताचे लेखक कोण आहेत?**
१) रवींद्रनाथ टागोर
२) महर्षी वाल्मिक
३) कालिदास
४) बंकिमचंद्र चटर्जी

**९) सूर्यनमस्कारामध्ये किती प्रकारचे व्यायाम केले जातात?**
१) १० २) १३
३) १२ ४) १७

**१०) 'जागतिक मराठी अकादमीच्या २१ व्या साहित्य संमेलनाचे' अध्यक्ष कोण आहेत?**
१) डॉ.जयंती नारळीकर
२) डॉ.अनिल काकोडकर
३) डॉ. रघुनाथ माशेलकर
४) डॉ. वसंत गोवारीकर

**११) 'पारंपरिक औषध जागतिक शिखर परिषद' कोठे पार पडली?**
१) मुंबई २) कोलकाता
३) पश्चिम बंगाल ४) नवी दिल्ली

**१२) 'हॉर्नबिल महोत्सव' तथा 'उत्सवांचे उत्सव' कोणत्या राज्यात साजरा केला जातो?**

१) कोहिमा, नागालँड  २) आसाम

३) केरळ  ४) आंध्रप्रदेश

**१३) 'सूर्यकिरण सैन्य सराव' कोणत्या दोन देशांत पार पडला?**

१) भारत व चीन  २) नेपाळ व चीन

३) भारत व नेपाळ  ४) भारत व अमेरिका

**१४) संयुक्त राष्ट्रांच्या 'हवामान बदल परिषदेचे' (COP-30) आयोजन कोणत्या देशात करण्यात आले?**

१) भारत  २) रशिया

३) ब्राझील  ४) अमेरिका


**१५) स्वामी विवेकानंद यांनी स्थापन केलेल्या संघटनेचे नाव सांगा?**

१) रामकृष्ण मिशन  २) प्रार्थना समाज

३) सत्यशोधक समाज ४) अभिनव भारत संघटना

---

## डिसेंबर २०२५ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (डिसेंबर २०२५) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ३ | २) २ | ३) ३ | ४) १ | ५) १ |
| ६) ३ | ७) २ | ८) २ | ९) २ | १०) २ |
| ११) २ | १२) २ | १३) २ | १४) १ | १५) १ |

## चित्रकोडे (ऑक्टोबर-नोव्हेंबर) यशस्वी स्पर्धक

**गोवा** – कु. सृष्टी

**सातारा**– कु. ध्रुव जगदाळे, कु. आर्यन जगदाळे, कु. हर्षवर्धन सोडमिसे, कु. शौर्य सरगडे,

**ठाणे** – कु. आयरिस मिरांडा, कु. जुई पळसटकर, कु. कस्तुरी वाणी,

**नंदुरबार** – कु. संगिता वळकी, कु. प्रणव पाडवी,

**यवतमाळ** – कु. सुहानी कालोकार,

**कोल्हापूर** – कु.आराध्या रावळ, कु.ओंकार रावळ, कु. वेदांत गोईलकर,

**परभणी** – कु. मनाली पत्रे, कु. तेजस साखरे, कु. संविधान कांबळे, कु. माधव कौठे, कु. वैष्णवी कौठे, कु. प्रेम काळे, कु. समृद्धी मठपती

**नागपूर** – कु. नीरजा कुलकर्णी,

**पुणे** – कु. तनिष्का जाधव, कु. कौस्तुभ कुलर्णी, कु. जान्हवी खरमाळे, कु. समृद्धी चौधरी, कु. पायल जाधव, कु. अनुश्री खरमाळे,

**सांगली** – कु. श्रेयश पाटील, कु. श्रीवर्धन कुंभार, कु. राजवर्धन नरुटे, कु. कार्तिक तडाखे, कु. हर्षवर्धन दिवे, कु. स्वराज घस्ते, कु. रुद्र पवार, कु. श्रेयस शेवडे, कु. आयुष चौगुले, कु. ओम बावणे, कु. समर्थ शेवडे, कु. संभव चरापले,

**मुंबई** – कु. आदित्य केळुसकर,

**नांदेड** – कु. विराट गाढे, कु. जैद शेख, अ.गफार फाजलाणी, कु. जिक्रा शेख,

**बेळगाव** – कु. विद्धेश गावडे,

**अहिल्यानगर** – कु. नक्षत्रा गायखे, कु. गौरी धस, कु. शिवन्या धस, कु. पार्थ वाणी, कु. श्लोक आमले, कु. आरोही धस, कु. रोहित चौगुले, कु. पायल जाधव,

**सिंधुदुर्ग** – कु. गौरी आयरे, कु. देवांश चव्हाण, कु. आरोही राऊत, कु.जीनत शेख, कु. गौरी दसुरे, कु. प्रज्ञा आयरे, कु. गौरी गोरुले, कु. गौरांग साळस्कर, कु. वासंती धुरी, कु. दुर्वा चव्हाण, कु. शुभ्रा राडये, कु. रिचा साळस्कर, कु. शौर्य ठुकरुत, कु. गौरी गोरुले, कु.अंश घाडी, कु. सान्वी तळेकर, कु. हर्षाली घाडी, कु. रामदास साळस्कर, कु. अथर्व पवार, कु. पूर्वा घाडी, कु. मेघना मेस्त्री, कु.शिवम तेली, कु. मानवी राडये, कु. कैलास सावंत, कु. आनंद घाडी, कु. रुद्र गोरूले, कु. स्वरुप परब, कु. दिव्या गोरुले, कु.यशश्री राऊत, कु. रुद्राक्ष देवरुखकर,

**रत्नागिरी** – कु. वेदिका दिवाळे, कु. सुदिक्षा राजये, कु. लावण्या साळुंखे, कु. जान्हवी गुरव, कु. श्रेयश सोडये, कु. संभव कोलगे, कु. विराज ठिक, कु. श्लोक गुरव, कु. मानस झिमण, कु. जित्वर सोडये, कु. श्रेयश नामये, कु. चित्रेश गुरव, कु. रूद्र गुरव, कु. संभव कोलगे, कु. अथर्व मालप, कु. राजवीर पाटील,

**नाशिक** – कु. अनय बारवकर,

# भावी आधारस्तंभ

**माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.**

- **तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?**
- **जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?**
- **ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?**

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



एके दिवशी मी सायंकाळी घराबाहेर पडले होते. आमच्या घरापासून थोड्या अंतरावर एक मैदान होते. पावसाळ्याचे दिवस होते. दररोज एक मेंढपाळ काका तिथे आपल्या शेळ्या चरायला आणायचे. तिथं हिरवेगार गवत होते. मी तर कधी कधी लहान करडू सोबत खेळायला जात असे. एके दिवशी मी त्या मैदानात करडू पकडायला गेले, पण त्या वेळी मेंढपाळ काकांनी शेळ्या घरी नेल्या होत्या. मग मी घरी परतत होते. तेव्हा मला एक लहान करडू दिसलं व मी विचारात पडले. सगळ्या शेळ्या निघून गेल्या व हे एकटंच इथं काय करतं ? मग मी त्या करडाला पकडले. तेवढ्यात मला एक कुत्र्यासारखा प्राणी दिसला पण त्या मैदानावर कुत्रे येत नव्हते. मग मला समजलं की हा लांडगा आहे. मग मी बाबांना बोलावलं आणि बाबांनी त्या लांडग्याला पळवलं. तेवढ्यात ते मेंढपाळ काका पण आले व मी त्यांना सगळी गोष्ट सांगितली त्या करडाचापण जीव वाचला आणि त्या मेंढपाळ काकांनी आणि बाबांनी सुद्धा माझं कौतुक केलं.

**कु. शेजल परसराम सावरकर**
जि.प.प्राथमिक शाळा, पळसगाव/राका
पंचायत समिती सडक अर्जुनी, जि. गोंदिया ४४१८०६



एके दिवशी मी चालत घरी येत होते. तेव्हा मला एका झाडाच्या खाली मांजराची दोन पिल्ले पावसात भिजलेली दिसली. ती पावसात भिजलेली त्यामुळे ती थरथर कापत होती. मी ती दोन्ही पिल्ले घरी आणली आणि त्या दोन्ही पिल्लांना मी पुसले. त्या दोन्ही पिल्लांना मी एका वाटीत दूध ठेवले. त्यातील एक पिल्लू मी माझ्या आजीला दिले आणि एक पिल्लू मी मला ठेवले. मी त्या पिलाला रोज त्या दुसऱ्या पिल्लासोबत खेळायला नेत होते. जस जशी ती पिल्ले मोठी होत गेली; तसं ते दुसरं पिल्लू जे मी माझ्या आजीला दिल होतं ते आता आमच्या घरी येऊ लागलं होतं.

पण मला अजूनही त्यांच्या आईचा शोध लागला नाही. जे पिल्लू माझ्याकडे होते त्याचे नाव मी राणी व दुसऱ्या पिल्लाचे नाव मी हरिणी ठेवले. एकदा राणी अचानक गायब झाली. मी तिला सगळीकडे खूप शोधले. पण ती सापडली नाही. परंतु आम्ही अजूनही हरिणीची काळजी घेतोय.

**कु. नेहा विठ्ठल बनकर**
जि.प.केंद्र शाळा निंबळक, ता. फलटण, जि. सातारा



एके दिवशी मी माझ्या आईसोबत शाळेतून घरी परत येत होते. तेव्हा मला एक मुलगी एकटी घरी जाताना दिसली. तेव्ही मी त्या मुलीला विचारले की, ''तू कितवीत आहेस?'' ती म्हणाली ''मी पहिलीत आहे.'' मी तिला विचारले ''तू रोज चालत येतेस का?'' ती म्हणाली ''आज माझी आई मला आणायला आली नाही म्हणून, मी चालत जात आहे.'' मी तिला विचारले की, ''आम्ही तुला घरी सोडू का?'' ती म्हणाली, ''हो'' मग माझ्या आईने आणि मी त्या मुलीला तिच्या घरी सोडले. ती खूप खूश झाली. मग माझ्या आईने तिच्या आईला समजावले.

माझी सर्व पालकांना विनंती आहे की आपल्या मुलांना एकटे शाळेला पाठवू नका.

**कु. आराध्या दिगंबर कल्याणकर**
इ.४थी, साधना विद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर ४१६५०२.



उन्हाळ्याच्या सुटीत मी माझ्या घराच्या पाठीमागे बसलो होतो. तिथे काही वेळाने मेंढ्या आल्या व जवळ असलेल्या बादलीतून पाणी पिऊ लागल्या. बादलीतील पाणी संपले. मेंढ्या बिचाऱ्या तशाच उभ्या होता. मग मी माझ्या बाबांना सांगून पाण्याचा बोअर चालू केला व बादली भरून दिली. अनेक मेंढ्या तिथे आल्या व त्यांनी पाणी पिऊन समाधानाची ढेकर दिली. मग मी दररोज त्यांची वाट पाहू लागलो. मेंढपाळ मामा व त्यांच्या मेंढ्या आल्या की मी लगेच पाणी भरण्यासाठी व पिण्यासाठी बादल्या, टब असे साहित्य अंगणात ठेवून बोअरद्वारे ते भरून घेत असे. मग मेंढ्या यायच्या व पोटभर पाणी प्यायच्या. उन्हाळ्याच्या सुटीत हा माझा दररोजचा, सकाळ संध्याकाळचा उपक्रम झाला होता. पाऊस सुरू झाल्यानंतर मेंढपाळ मामा इकडे फिरकत नाहीत परंतु उन्हाळ्याच्या दुष्काळी परिस्थितीत आपण मुक्या जीवांना पाणी दिले. याचा मला खूप आनंद होतो.

**कु. अभिनव विशाल देशमुख**
इ.३री, प्लॉट नं.१४, शास्त्रीनगर, ढेकूसिम रोड, अमळनेर, जि. जळगाव ४२५४०१.



दिवाळीची सुट्टी होती. मी आजीसोबत विड्याचे माप द्यायला चालले होते. दिवाळीमुळे रस्त्यावर खूप गर्दी होती. आजी व मी रस्ता ओलांडत होतो इतक्यात समोरून आमच्या शेजारच्या विमल आजी विड्याचे माप घेऊन येत होत्या. त्यांना चक्कर आल्यामुळे त्या पडायला लागल्या. लगेच मी त्यांना रस्त्याच्या बाजूला घेतले व जवळच्या घरातून प्यायला पाणी आणून दिले. त्यांना तिथेच बसवून ठेवले. सोबत मी सुद्धा थांबले. तोपर्यंत माझी आजी माप देऊन आली, जाताना विमल आजीचे विड्याचे माप माझ्या डोक्यावर घेतले. हळू हळू आम्ही घरी आलो. हा दिवस कायम माझ्या आठवणीत राहील.

**कु. अक्षरा अक्षय हासे**
जि. प. प्राथमिक शाळा, राजापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

# उमलती प्रतिभा

## राजमाता जिजाऊ

महान ती, थोर ती
अशी मायाळू आई
लक्ष्मी भोसले घराण्याची
त्यांचे नाव होते जिजाबाई
म्हाळसाबाईंच्या पोटी जन्मल्या
स्वराज्य जननी जिजाऊ
नेतृत्वाचे गुण अंगी
होत्या शूर लढाऊ
माँसाहेब त्या रयतेच्या
राजमाता स्वराज्याच्या
सद्‌गुणांचा सागर जणू
आऊसाहेब शिवरायांच्या
अशी आपली मायभवानी
अशी धुरंधर रणरागिणी
आई जगदंबा उभी पाठीशी
नमन माझे जिजाऊ चरणी

कु. ज्ञानेश्वरी पोपट शेळके
न्यू इंग्लिश स्कूल करंजाळे
करंजाळे, ता. जुन्नर, जि. पुणे ४१२४०९

## अभ्यास मी करणार

आजी–आजोबांच्या स्वप्नासाठी,
अभ्यास मी करणार
म्हणत होते आजोबा, म्हणत होती आजी
नातू माझा होईल डॉक्टर, करील उपचार
आजी–आजोबांच्या स्वप्नासाठी,
अभ्यास मी करणार
आई–वडलांच्या संघर्षाची कष्टाची अन् सुखदुःखाची,
आठवण मी ठेवणार आई–वडलांच्या स्वप्नासाठी;
अभ्यास मी करणार
प्रेमळ मामा, प्रेमळ आत्या, काका मावशी आनंदी होईल
भेटायला येतील मित्र फार, मामा, आत्या, काका,
मावशी, यांच्या स्वप्नांसाठी
अभ्यास मी करणार
होतील आनंदी सर्वच, कौतुक होईल फार
अभ्यासाच्या जोरावर यश मी गाठणार
या सर्वांच्या स्वप्नासाठी,
अभ्यास मी करणार
या सर्वांच्या स्वप्नासाठी, अभ्यास मी करणार

कु. अभिजीत अर्जुन पवार
इ.७वी, गजानन विद्यालय, लवूळ, ता.माजलगांव,जि.बीड ४३११३१



कु. जान्हवी मोरे
जि.प. शाळा कोकणगाव, ता. निफाड, जि. नाशिक



कु. प्राजक्ता राहुल सुतार
इयत्ता ६ वी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वनवासमाची नवी, ता. कराड, जि. सातारा–४१५१२४

# एका गरीब मुलाची गोष्ट

रामपूर नावाच्या गावात एक गरीब मुलगा होता. त्याचे नाव राजू होते. तो खूप हुशार व कष्टाळू मुलगा होता. पण त्याची शाळा शिकण्याची परिस्थिती नव्हती. त्यांना राहण्यासाठी घरपण नव्हतं. तो व त्याचे कुटुंब एका झोपडीत राहायचे.

एकदा तो शाळेजवळच्या मैदानात खेळायला जात होता. तेव्हा एक सर शाळेतून घरी जाताना त्यांचा पाय घसरल्याने पडले. तेव्हा धावत जाऊन राजूने त्यांना पकडलं त्यावर त्या सरांनी त्यांना विचारले. ''अरे बाळा, तुझे नाव काय?'' ''माझे नाव राजू'' ''तू कुठल्या शाळेत शिकतो,'' ''अहो सर मला शाळेत जायला पैसे नाहीत.''

''आमची घरची परिस्थिती खूप गरीब आहे. म्हणून मी शाळेत जात नाही.'' ''अरे राजू बाळा घाबरू नको, मी तुझ्या सर्व शिक्षणाची जबाबदारी घेतो. तू उद्यापासून आमच्या शाळेत ये'' हे ऐकल्यावर राजू खूप खूश झाला व त्या सरांचे आभार मानले व तो घरी गेला.

त्याने जाऊन आपल्या आईबाबांना सांगितलं. त्याचे आई बाबा खूप खूश झाले व दुसऱ्या दिवशी तो शाळेत गेला व त्याचा पूर्ण दिवस खूप छान गेला त्याला मित्रपण मिळाले. संध्याकाळी शाळा सुटली व तो घरी गेला. त्याला आई, बाबांनी विचारले की, ''तुझा पहिला दिवस कसा गेला?'' ''माझ्या पहिला दिवस खूप छान गेला. मला तर शाळेत खूप मजा आली. मला सरांनी गणित विचारलं मग मी त्या गणिताचं उत्तर सांगितलं. तेव्हा मला सरांनी सांगितले की तू खूप हुशार आहेस. हे ऐकून तर मला खूप आनंद झाला.''

**कु. मानवी महेश नाईक**
इ.६वी, जि.प.पू.प्राथमिक केंद्र शाळा, शेर्ले नं.१, सिंधुदुर्ग -४१६ ५१४



**कु. पवित्रा मधुकर भोईर**
इ.८वी, प्रेरणा विद्यालय सोनावळे, ता.मुरबाड, जि.ठाणे-४२१४०२



**कु. दुर्वा राजू भास्करवार**
इ.६ वी, स्वामी विवेकानंद टेक्नॉ स्कूल, किनवट


जादूगाराची सुटका
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
थोड्या वेळात गाडी चेक पोस्टच्या जवळ येऊन थांबली.
गाडी थांबताच विनय हळूच गाडीतून बाहेर पडला व जवळच्या झाडीत घुसला.
यांनी गाडी का थांबवली? पुढे चेक पोस्टवर पोलीस आहेत.
काय झालं! गाडी मध्येच का थांबवली? चला, बाहेर या.
गाडी अचानक बंद पडली...


गाडी इथेच राहू द्या. तिकडे चेकपोस्टवर साहेब आहेत तिकडे चला.
नंतर
सर, या दोघांची गाडी अचानक बंद पडली.
चेक पोस्टवर तिघेच पोलीस आहेत. आणि त्या साहेबांनी तर गॉगल घातला आहे.
काहीही करून त्याने गॉगल काढायला हवा, तरच मी तुमची मदत करू शकेल.
हे बघा हे कामसुद्धा तुमचेच आहे. जा तिकडे आणि बघा काही करता येते का?
ठीक आहे बघतो.
गाडीत लपलेला अभय..
नक्की काय करताहेत हे दोघं... जवळ जाऊन बघायला हवं.
क्रमशः

# बारा महिन्यांचे गाणे

सतीश कोंडू खरात










आला मधुमास चैत्र सुंदर
फुलांना बहर आंब्याला मोहर
पेटला वैशाख सूर्य दाहक
फुलले पळस सुरंगी मोहक
आला ज्येष्ठ उधळीत वारा
मृद्गंधात पाऊस धारा
आषाढाला विठूची वारी
अवघे शिवार दिसे पंढरी
श्रावण हिरवा भरजरी
उन्हात शिरवा सोनसरी
उंच डोंगर हिरवळ दाट
भाद्रपदाचा गुलजार थाट
येता अश्विन शरद मासी
झेंडूची तोरणे धान्याच्या राशी
कार्तिकाचे कौतुक किती?
लक्ष लक्ष दीप उजळती
मार्गशीर्षात शीतल चांदणे
कणसे भरली मोत्यांची दाणे
पौष गारवा कोवळी पहाट
मोतिया दवांत भिजली वाट
आला माघ झडली पाने
पिवळी पडली हिरवी राने
फाल्गुनात पडले पाऊल
झाडा-वेलींना वसंत चाहूल
बारा महिन्यांचे बारा सोहळे
शब्द गुंफून गीत जुळे

संपर्क : ९४०४३७५८६९



# Dear Students, You are

Anand Deshmukh

You are the flowers
Growing on the tree
Read something new
When you are free


You are the stars
Shining in the sky
Become the reason of
Someone's Joy

You are the birds
With wings so wide
Hopes of the parents
And our nation's pride

You are Various
Colours of the rainbow
Keep sharing everyday
Whatever you know

You are the students
Of the global class
Learn more, play more
And improve your class

Contact : 9860630230



# The Heron's Feather

Dr. Rasika Thosar

Ravi, the teacher, was exhausted after a long, hard day at school. He walked through the fields towards the small town where he lived. “I wonder what’s for dinner?” he said to himself. Just then, Ravi felt something tickly in his throat. He coughed and coughed — and a grey object came out of his mouth. He yanked it out and looked at it — it was a heron’s feather!

“How peculiar!” he thought. “I certainly haven’t eaten that. How did it get in my throat?”

When he got home, his wife was busy washing the laundry.

“A strange thing happened to me today!” he told her. “But promise that you will not tell another living soul, or I might become the talk of the town!”

His wife promised that she wouldn’t say a word, so he told her about the heron’s feather that had come out of his mouth.She agreed that this was very peculiar indeed! In fact, she couldn’t stop thinking about it. When she went outside to hang out the washing, their neighbour waved at her over the fence.

“Hello there!” the neighbour said. “Have you heard any interesting news today?”

“My husband told me something very strange this afternoon,” replied the teacher’s wife. “He said he was walking home and… you won’t believe it… a feather came out of his mouth! But you must promise not to tell anyone!”

The neighbour then went to the shop to buy some vegetables. The shopkeeper loved to gossip and told her all about what was going on in the town.



"Oh, I have an interesting story for you!" said the neighbour. "Ravi the school teacher was giving a lesson today… and a bunch of heron feathers came out of his mouth. His wife told me this, so it must be true!"

The shopkeeper gasped. "That is amazing!" he said. The neighbour agreed and left with her shopping bags.

A bell rang as the blacksmith came into the shop. "Do you have any nails?" he asked.

The shopkeeper fetched them from a high shelf. "Did you hear about Ravi the schoolteacher?" he whispered. "You will never believe this, but… he was walking down the street, and a whole heron popped out of his mouth!" "That's fantastic!" exclaimed the blacksmith. He hurried home to tell his wife. "Something very strange happened to Ravi the school teacher!" he told her. "He was buying pencils in the village shop — and suddenly a flock of birds flew out of his mouth!"

The blacksmith's little boy was peeking through the door and overheard this. He ran outside to tell his friends. Before long, the story had spread throughout the town! When Ravi walked into the classroom the next morning, there was no chatting or giggling from his pupils. They were all staring at him — it was very unusual! Even more strangely, their parents were standing outside, peering at him through the windows.

"Why are you all looking at me like that?" he asked. After a pause, one boy at the front spoke up. "We heard that yesterday a heron flew out of your mouth, and a crow and an owl and some sparrows too. And a river of water with fish of all kinds in it! We want to see you do it again!" Ravi sighed and put his books on the desk.


"Today's lesson is a very important one, about gossip and how silly it is to believe rumours!" he said. "I think you all need to learn it!"

**Contact : 9970273841**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

Raju is in hurry to find which route he should take adds up to 50. Can you help him?






Can you mark the eight differences in the mirror?



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२६.

३) कोड्याचे उत्तर फेब्रुवारी २०२६ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.12.2025, Date of Posting - 27th & 28th December 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)














**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित ‘निवडक किशोर’चे १४ खंड





किंमत प्रत्येकी
₹ १६३/-
(५०% सूट)





किशोर

**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-**


**If not delivered please return to :**
संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० - २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,